www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-222 • Thursday, 18 January 2024 •Pages-04 •Rs.2/-

अनमोल विचार

"मेहनत नावाचा मित्र सोबत असला की अपयश नावाच्या शत्रूची भीती वाटत नाही."

लक्षवेधी

अयोध्या ते बेंगळुरू विमान सेवा सुरू..

नवी दिल्ली : राम मंदिर प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमाच्या काही दिवस अगोदर, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी बुधवारी अयोध्या ते बेंगळुरू आणि अयोध्या ते कोलकाता दरम्यानच्या पहिल्या एअर इंडिया एक्सप्रेस फ्लाइटचे उद्घाटन केले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना कोलकाता ते अयोध्या दरम्यानच्या पहिल्या विमानाचा बोर्डिंग पास मिळाला. यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की, उत्तर प्रदेशचा विकास नवीन उंची गाठत आहे. गेल्या नोव्हेंबरमध्ये आम्ही दिवाळी साजरी केली. आता आणखी एक दिवाळी २२ जानेवारीला साजरी केली जाणार आहे.

अयोध्येतील सोहळा राजकीय स्टंटबाजी; अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल

नवी दिल्ली : अयोध्येत नव्याने बांधल्या जाणाऱ्या राम मंदिरात येत्या २२ जानेवारी रोजी श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. मंदिर समितीने या दिवशी मोठ्या सोहळ्याचे आयोजन केले असून हजारो लोकांना या कार्यक्रमासाठी निमंत्रण पाठवले आहे. तसेच हा कार्यक्रम म्हणजे एक प्रकारची राजकीय स्टंटबाजी आहे. मुळे२२ जानेवारी रोजी होणाऱ्या या कार्यक्रमाला स्थगिती द्यावी, यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. तसेच याचिकाकर्त्यांनी चार पीठांच्या शंकराचार्यांनी या कार्यक्रमावर घेतलेल्या आक्षेपांचा दाखला दिला आहे. गाझियाबाद येथील रहिवासी भोला दास यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात नुकतीच एक याचिका दाखल केली आहे.

केजरीवाल म्हणाले, 'अखेर राम मंदिर सोहळ्याचे निमंत्रण मिळालेच नाही

नवी दिल्ली : अयोध्येत 22 जानेवारी रोजी होणाऱ्या राम लल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अखेर निमंत्रण मिळालेच नाही. केजरीवाल यांनी याबाबतची माहिती दिली आहे. केजरीवाल म्हणाले की, राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे अखेर निमंत्रण मिळालेले नाही. मात्र मी 22 जानेवारीनंतर आई-वडील आणि पत्नीसह अयोध्येला जाणार आहे. केजरीवाल म्हणाले की, मला श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे पत्र मिळाले आहे. पण मला सांगण्यात आले की, प्राणप्रतिष्ठा समारंभासाठी वैयक्तिक आमंत्रण देखील पाठवले जाईल, मात्र अद्याप ते मिळालेले नाही.

हिंदू-मुस्लीम वाद पेटवण्यासाठीच मशीद तोडणे, हेच भाजपचे ध्येय होते; दिग्विजय सिंह यांचा आरोप

नवी दिल्ली : अयोध्येत राम मंदिर उद्घाटनाची तयारी पूर्ण झाली आहे. तसेच अनेक मान्यवरांनी सोहळ्याची निमंत्रणे पाठवण्यात आली आहे. आता या मुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोपाच्या फेरी झडत आहे. त्यातच काँग्रेस नेते दिग्विजय सिंह यांनी याबाबत महत्त्वाचे विधान केले आहे. राम मंदिराचे निर्माण करणे, हा भाजपचा हेतू नव्हता. तर मशीद तोडणे हा त्यांचा हेतू होता. या मुद्द्याचे भाजपने राजकीय भांडवल केले. तसेच जनतेची दिशाभूल केल्याचा आरोपही सिंह यांनी केला आहे. निवडणुकीत सातत्याने होत असलेल्या पराभवामुळे भाजपने मंदिर-मशीद वादाला खतपाणी घातले. हिंदू-मुस्लीम वाद पेटवण्यासाठीच मशीद तोडणे, हेच भाजपचे ध्येय होते. त्यांना मंदिर निर्माण करायचे नव्हते, असा आरोपही सिंह यांनी केला आहे.

राम मंदिराच्या नावावर होतेय फसवणूक

नवी दिल्ली : भारतात ज्या गोष्टीची सर्वाधिक चर्चा होते, त्याच्या नावाने फसवणुकीचे प्रकार होताना दिसतात. सध्या देशभरात अयोध्येचे राम मंदिर आणि प्राणप्रतिष्ठा सोहळा चर्चेत आहे. राम मंदिरासाठी लोक खूप दान करत आहेत. 22 जानेवारीला होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला जाण्यासाठी अनेकजण उत्सुक आहेत पण या सोहळ्यासाठी केवळ निमंत्रितांनाच उपस्थित राहता येणार आहे. 22 जानेवारीला ज्यांना निमंत्रण आले आहे तेच लोक अयोध्येला जाऊ शकतात. मात्र राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा फायदा सायबर चोर घेत आहेत. सध्या राम मंदिरात दान, प्रसाद, व्हीआयपी पास असे अनेक प्रकार घडत आहेत. याचा फायदा घेऊन सायबर भामटे रामभक्तांना आपल्या जाळ्यात ओढत असून मोठी आर्थिक फसवणुक करत आहेत.

११,००० फूट उंचीवरील शिखर सर करुन ध्वज फडकवणारी अशी आहे चादर ट्रेक मोहिम

नवी दिल्ली : नौदल प्रमुख ॲडमिरल आर. हरीकुमार यांनी १६ जानेवारी २४ रोजी आय. एन. एस. शिवाजी येथे भारतीय नौदलाच्या चादर ट्रेक (गोठलेली झांस्कर नदी, लडाख) मोहिमेला हिरवा झेंडा दाखवला. नौदल प्रमुखांनी पथकाचे प्रमुख कमांडर सी. डी. ओ. नवनीत मलिक यांच्याकडे औपचारिक आइस एक्स सुपूर्द केला आणि त्यांना मोहिमेच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या. १३ सदस्यांचे पथक ११,००० फूट उंचीवरील शिखर सर करेल आणि तिथे राष्ट्रध्वज आणि नौदलाचे चिन्हध्वज फडकवेल. ही मोहीम भारतीय नौदलाच्या साहसी मनोवृत्तीचे मूर्त स्वरूप आहे. आव्हाने तसेच प्रतिकूल हवामान परिस्थितीचा सामना करण्यास सक्षम असलेले मजबूत आणि लवचिक कार्यबल तयार करणे हे याचे उद्दिष्ट आहे.

22 जानेवारीला राष्ट्रीय सुट्टी जाहीर होण्याची शक्यता

नवी दिल्ली : 22 जानेवारीला अयोध्येत श्रीराम मंदिराचे उद्घाटन होणार आहे. त्यामुळे 22 जानेवारीला राष्ट्रीय सुट्टी जाहीर होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारकडून त्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत. येत्या दोन दिवसात 22 जानेवारी हा दिवस संपूर्ण देशभरात राष्ट्रीय सुट्टी म्हणून जाहीर करण्याच्या जोरदार हालचाली सुरु आहेत. अयोध्येत प्राणप्रतिष्ठा सोहळ्याआधी जोरदार तयारी सुरु आहे. २४ तास मंदिराचे काम चालू आहे. उत्तर प्रदेशात आधीच या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील लोकांना या दिवशी दिवाळी साजरी करण्याचं आवाहन सरकारने केले आहे. जे लोकं बाहेरून अयोध्येत येणार आहे. त्यांची गैरसोय होणार नाही यासाठी योग्य ते पाऊलं उचलण्याचे आदेश योगी सरकारने दिले आहेत.

दिग्गज नेते ज्या माणसामुळे बाहेर गेले, त्याच माणसाच्या हातून पक्ष सुटला; शर्मिला ठाकरेंचा उद्धव ठाकरेंना टोला

■मुंबई। यश सावंत,

उद्धव आणि राज या ठाकरे बंधूंमधलं वैर जगजाहीर आहे. राज ठाकरेंनी शिवसेना सोडून साधारण दोन दशकं होऊन गेली तरी दोन्ही चुलत भावांमधून विस्तवही जात नाही. मोजक्या कौटुंबिक कार्यक्रमांचा अपवाद वगळता दोघांनी एकमेकांसोबत येणंही टाळलंय. ठाकरे बंधूंमधल्या वादाचा आता पुढचा अध्याय सुरु झालाय. काही दिवसांपूर्वी दिशा सालियन आरोपांवरुन आदित्य ठाकरेंची बाजू घेणाऱ्या शर्मिला ठाकरेंनी उद्धव ठाकरेंना जोरदार टोला लगावलाय. विशेष म्हणजे राज ठाकरेंनी शिवसेना सोडली त्याचा संदर्भ शर्मिला ठाकरेंच्या टीकेला आहे.

ज्या माणसामुळे शिवसेनेतल्या दिग्गज नेत्यांना बाहेर पडावं लागलं. त्याच माणसाच्या हातातून पक्ष सुटलाय असा टोला शर्मिला ठाकरेंनी उद्धव ठाकरेंना लगावलाय. विक्रोळीत मनसेच्यावतीने महोत्सावाचं आयोजन करण्यात आलं होतं. यात बोलताना शर्मिला ठाकरे यांनी 'या महिन्याच्या 10 तारखेला एक वर्तुळ पूर्ण झालं. शिवसेनेतील दिग्गज नेत्यांना ज्या माणसामुळे

बाहेर पडावं लागलं, त्याच माणसाच्या हातून पक्ष सुटला' असं शर्मिला ठाकरे म्हणाल्या. शिवसेना आमदार अपात्रता निकालांनंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नव्हती. त्यात शर्मिला ठाकरेंनी एक वर्तुळ पूर्ण झालं म्हणत उद्धव ठाकरेंवर निशाणा साधलाय. 10 जानेवारीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल देताना शिंदे गटाला शिवसेनेची मान्यता दिली. राहुल नार्वेकरांच्या या निकालावरूनच शर्मिला ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर बोचरी टीका केली आहे.

शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली. तेव्हापासून ठाकरे कुटुंबीयातील राजकीय वाद सार्वजनिक व्यासपीठावरूनही दिसून आले आहेत. आता या राजकीय वादांमध्ये राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जाहीर टीका केली आहे. दिशा सॅलियन प्रकरणात शर्मिला ठाकरेंनी आदित्य ठाकरेंची पाठराखण केली होती, मात्र शिवसेना आमदार अपात्रता निकालानंतर त्यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधण्याची संधी सोडली नाही. उद्धव ठाकरेंसाठी अत्यंत भावनिक असणाऱ्या विषयावर शर्मिलांनी टोला लगावला. त्यामुळे यानिमित्तानं राज ठाकरे विरुद्ध उद्धव ठाकरे वाद पुन्हा भडकण्याची शक्यता आहे.

९ हजार दुकानांवर अद्यापही मराठी पाटी नाही; ३ महिन्यांची मुदत देऊनी उदासीनता

■मुंबई। विशाल कारंडे,

दुकाने आणि आस्थापनांवरील पाट्या मराठीत असायला हव्यात, असा निवाळा सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर तसेच पाट्या मराठीत करण्यासाठी पालिकेने तीन महिन्यांची मुदत देऊनही पाट्या न लावणाऱ्या दोन हजार दुकानदारांवर कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया महापालिकेने सुरू केली आहे. पाट्या मराठीत लावल्या आहेत की नाही याची तपासणी करण्याचे काम पालिकेने नोव्हेंबर २०२३ सालापासून सुरू केले. रोज दोन हजार दुकानांची तपासणी केली जात होती. महिनाभर तपासणी केल्यानंतर ७ ते ८ टक्के दुकानदारांनी पाट्या मराठीत लावल्या नसल्याचे आढळून आले होते. या दुकानदारांना त्यानंतर नोटिसा बजावण्यात आल्या. प्रती कामगार दोन हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. दंड न भरणाऱ्या दुकानदारांच्या विरोधात न्यायालयात अहवाल सादर केला जाणार आहे. पालिकेची तपासणी मोहीम ३१ जानेवारी २०२४ पर्यंत सुरू राहणार आहे. त्यानंतर मात्र प्रत्यक्ष कायदेशीर कारवाईला सुरुवात होईल.

'प्राणप्रतिष्ठा अयोध्येत, पण घराघरात प्रज्वलीत होणार श्रीराम ज्योती'

■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,

श्रीराम जन्मभुमी अयोध्येत रामललाच्या प्राणप्रतिष्ठेपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अकरा दिवसांचा उपवास धरला आहे. या कालात ते देशभरातील विविध मंदिरांना भेटी देत आहेत. सध्या पीएम दोन दिवसांच्या केरळ दौऱ्यावर आहेत. यादरम्यान, त्यांनी त्रिशूरमधील गुरुवायूर मंदिरात पूजा केली. यानंतर भाजप कार्यकर्त्यांना संबोधित केले. बुधवारी केरळमधील कोची येथील शक्ती केंद्र प्रभारी परिषदेत पंतप्रधान मोदी म्हणाले की, '22 जानेवारी रोजी अयोध्येत प्राणप्रतिष्ठा होईल, हा सोहळा लाखो करोडो लोकांसाठी भक्ती आणि विश्वासाने भरलेला क्षण असेल. सोहळा अयोध्येत होतोय, पण देशातील प्रत्येक घरात आणि प्रत्येक मंदिरात श्रीराम ज्योती प्रज्वलीत केली जाईल. या पार्श्वभूमीवर मी तुम्हा सर्वांना आपल्या परिसरातील मंदिरांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्याचे आवाहन करतो.' पंतप्रधान मोदींनी केरळच्या गुरुवायूर येथील भगवान कृष्ण मंदिरात पूजा केली. पूजेच्या वेळी त्यांनी केरळचा पारंपरिक पोशाख परिधान केला होता.

एकनाथ शिंदे-गौतम अदानींची भेट, पायाभूत सुविधा गुंवतणुकीवर चर्चा

■दावोस। विशेष प्रतिनिधी,

अदानी समूहाचे संस्थापक आणि अध्यक्ष गौतम अदानी यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महाराष्ट्र दालनात भेट घेतली. यावेळी त्यांच्यात महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा क्षेत्र, गुंतवणुकीच्या संधी आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली. बेल्जियम येथील एबीआयएन बेव्ह ही बहुराष्ट्रीय कंपनी महाराष्ट्रात 600 कोटी रुपये ची गुंतवणूक करणार असून या सामंजस्य करारावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. यामुळे राज्यात शेकडो रोजगार निर्माण होण्यास मदत होणार असून ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्रात उत्पादन क्षमता वाढवण्यावर भर दिला जाणार आहे.

शिंडलर समूहाच्या इलेक्ट्रिक कंपनीचे आंतरराष्ट्रीय कार्यान्वयन कार्यकारी उपाध्यक्ष मनीष पंत यांनी दावोस येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली.

भारत न्याय यात्रेत प्रकाश आंबेडकर सहभागी होणार, पण... काँग्रेससमोर ठेवली ही अट

■कल्याण। विशाल पाटील,

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मणिपूर ते मुंबईपर्यंत 6700 किलोमीटरची भारत जोडो न्याय यात्रा सुरु केली आहे. 66 दिवसांच्या ही यात्रा 15 राज्य, 100 लोकसभा आणि 337 विधानसभा मतदारसंघातून मार्गक्रमण करेल. याआधी राहुल गांधी यांनी सप्टेंबर 2022 ते जानेवारी 2023 पर्यंत कन्याकुमार ते काश्मिर अशी भारत जोडो यात्रा काढली होती. या यात्रेत अनेक नेते सहभागी झाले होते. यावेळी देखील इंडिया आघाडीतले

नेते यात्रेत सहभागी होण्याची शक्यता आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनाही निमंत्रण देण्यात आलं असून प्रकाश आंबेडकर यांनी हे निमंत्रण स्विकारलं आहे. प्रकाश आंबेडकर भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी होणार आहेत, पण यासाठी त्यांनी काँग्रेससमोर एक अट ठेवली आहे, प्रकाश आंबेडकर यांनी राहुल गांधी यांना यासंदर्भात एक पत्र पाठवलं आहे.

प्रकाश आंबेडकर यांचं पत्र

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी वारंवार संपर्क साधूनही इंडिया आघाडी अथवा मविआ मध्ये समाविष्ट करून घेतलेले नाही. यात विडंबन म्हणजे आपण पाठवलेल्या निमंत्रणात आपण INDIA आघाडीचे महत्त्वाचे घटक आहात असं म्हटले आहे.

राज्यातील दहा विद्यार्थिनींना न्यूयॉर्कमध्ये मिळणार शष्यवृत्ती; बारावी नंतरच्या पदवी शिक्षणासाठी मिळणार लाभ

■मुंबई। प्रतिनिधी,

महिलांचे सबलीकरण व्हावे, त्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी तसेच आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणात खंड पडू नये म्हणून न्यूयॉर्क येथील बरो ऑफ मॅनहॅटन कम्युनिटी कॉलेज (बीएमसीसी) या समुदाय महाविद्यालयाने सन २०२४ मध्ये महाराष्ट्रातील दहा विद्यार्थिनींना इयत्ता बारावी नंतरच्या पदवी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याचे जाहीर केले आहे. या शिष्यवृत्तीमुळे महाराष्ट्रातील दहा विद्यार्थिनींना उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठी न्यूयॉर्क स्थित या महाविद्यालयात प्रवेश मिळणार आहे. या शिष्यवृत्तीच्या रूपाने महाराष्ट्रातील विद्यार्थिनींना आंतरराष्ट्रीय शिक्षणाची कवाडे खुली होणार असल्याची माहिती शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली. मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील पत्रकार कक्षात बुधवारी त्यांनी ही माहिती दिली. या संधीप्रमाणे आणखी एक अशाच प्रकारची संधी जर्मनी मधील शैक्षणिक संस्थेतही उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील असल्याचेही केसरकर यांनी नमूद केले. यावेळी बरो ऑफ मॅनहॅटन कम्युनिटी कॉलेज (बीएमसीसी)चे उपाध्यक्ष डॉ. संजय रामदथ, महानगरपालिकेच्या नियोजन विभागाच्या संचालिका डॉ. प्राची जांभेकर, शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ, शिक्षणाधिकारी राजू तडवी उपस्थित होते.

अमोल मिटकरी यांचे मुख्य प्रवक्तेपद सहाच महिन्यात काढून घेतलं, उमेश पाटील अजित पवार गटाचे मुख्य प्रवक्ते

■मुंबई। दिगंबर जाधव,

अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांना त्यांच्या पक्षानं दणका दिला आहे. त्यांचं मुख्य प्रवक्तेपद सहा महिन्यांच्या आत काढून घेण्यात आलं आहे. त्यांच्या जागी उमेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सत्तेत सहभागी झाल्यानंतर अजित पवार यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अमोल मिटकरी यांची मुख्य प्रवक्तेपदी निवड करत असल्याची घोषणा केली होती. मात्र त्याला सहा महिने पूर्ण होण्याच्या आधीच हे पद काढून घेण्यात आलं आहे. राष्ट्रवादीत शरद पवार आणि अजित पवार असे दोन गट पडल्यानंतर आमदार अमोल मिटकरी यांनी अजित पवारांची साथ दिली. त्यावेळी त्या गटाच्या पहिल्या बैठकीत आमदार अमोल मिटकरी यांची पक्षाच्या मुख्य प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली होती. अजित पवार गटाचे एकूण सात प्रवक्ते आहेत. आता अमोल मिटकरींना मुख्य प्रवक्तेपदावरून दूर करून त्या ठिकाणी उमेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षाच्या या निर्णयानंतर आमदार अमोल मिटकरी यांनी एबीपी माझाला प्रतिक्रिया दिली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी, सिंधुदुर्गातील पोलिसांच्या बदल्या

■रत्नागिरी। नितीन देवळेकर,

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस दलात बदल्यांचे वारे वाहू लागले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील पोलिस निरीक्षकांच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात तर तेथील पोलिस निरीक्षकांच्या रत्नागिरी येथे बदल्या करण्यात आल्या आहेत. सहायक पोलिस निरीक्षक, पोलिस उपनिरीक्षक यांच्या जिल्हाअंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. मंगळवारी रात्री उशिरा हे बदल्यांचे आदेश काढण्यात आले.रत्नागिरीतील भरत ज्ञानदेव धुमाळ, रत्नागिरी ग्रामीणचे पोलिस निरीक्षक मारुती जगताप, संगमेश्वरचे सुरेश गावित, देवरुख पोलिस निरीक्षक प्रदीप पोवार यांची सिंधुदुर्ग जिल्ह्यात बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी सिंधुदुर्ग कणकवली पोलिस निरीक्षक अमित यादव, वैभववाडी पोलिस निरीक्षक फुलचंद मेंगडे, देवगड पोलिस निरीक्षक नीळकंठ बगळे, वेंगुर्ला पोलिस निरीक्षक अतुल जाधव यांची विशेष पोलिस महानिरीक्षक मुंबई यांच्या आदेशाने रत्नागिरी जिल्ह्यात बदली करण्यात आली आहे.

पुण्यात हायप्रोफाइल सेक्स रॅकेटचा पदार्फाश; 2 रशियन तरुणीसह मॉडेलला अटक



■पुणे। अभिजित येरल्लू,

उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या पुण्यातील विमानतळ परिसरातून हाय प्रोफाईल सेक्स रॅकेट उघडकीस आले. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी टाकलेल्या धाडीत एका राजस्थानी हिरोइनसह दोन रशियन तरुणींना ताब्यात घेण्यात आलेय. विमानतळ आणि कोरेगाव पार्क परिसरातील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या हॉटेलमध्ये हा गोरखधंदा सुरू होता. बुधवारी रात्री सामाजिक सुरक्षा विभागाने ही कारवाई केली.यातील टॉपची मॉडेल असलेली तरुणी ही राजस्थानातील अपकमिंग अभिनेत्री आहे. हायप्रोफाईल सेक्स रॅकेट सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचत धाड टाकली होती... एका पोलीस कर्मचाऱ्याला बनावट ग्राहक बनून पाठवण्यात आलं होतं. विशेष म्हणजे या सेक्स रॅकेटची सर्व सूत्र ही परदेशातून चालायची.. ऑनलाइन बुकिंग व्हायची.. पैसेही ऑनलाईन पाठवले जायचे.. एकदा खात्यात पैसे आले की एक थ्री स्टार हॉटेल बुक करून या तरुणीला तिथे पाठवली जायची. संबंधित ग्राहकालाही त्या हॉटेलचा पत्ता दिला जायचा.. आणि मग पुढचा व्यवहार पूर्ण व्हायचा.. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या मदतीने हा सर्व प्रकार उघडकीस आणला..

डॉ. सायरस के. मेहता यांना राज्यपाल रमेश बैस यांच्याकडून प्रतिष्ठित 'भारतीय नेत्र शल्यचिकित्सक' पुरस्कार

■मुंबई। अनिकेत भंकाळ,

मुंबईतील आघाडीचे नेत्रचिकित्सक डॉ. सायरस के. मेहता यांना महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस आणि लोकसभा खासदार श्रीमती पूनम महाजन यांच्याकडून प्रतिष्ठित ₹भारतीय नेत्ररोग तज्ञ₹ पुरस्कार प्राप्त झाला, जो त्यांच्या गौरवशाली कारकिर्दीतील एक नवीन शिखर आहे. हा सन्मान डोळ्यांची निगा राखण्यात त्यांचे असाधारण योगदान अधोरेखित करतो, जे उत्कृष्टतेसाठी त्यांची अटल वचनबद्धता दर्शवते. पुरस्काराबद्दल उत्साह व्यक्त करताना डॉ. सायरस के. मेहता म्हणाले, ₹भारतातील अग्रणी आय सर्जन पुरस्कार मिळणे हा मोठा सन्मान आहे. हे केवळ डोळ्यांची निगा राखण्यासाठी माझे समर्पणच दर्शवत नाही, तर आंतरराष्ट्रीय नेत्र केंद्रातील आमच्या टीमच्या

सामूहिक प्रयत्नांनाही ठळकपणे अधोरेखित करते.₹ भारतातील सर्वात प्रसिद्ध नेत्रचिकित्सकांपैकी एक मानले जाणारे डॉ. सायरस के. मेहता यांचा प्रवास नावीन्यपूर्ण आणि सर्जिकल उत्कृष्टतेची बांधिलकी यांनी वैशिष्ट्यीकृत केला आहे. 2000-2001 मध्ये अमेरिकन सर्जन, अमेरिकन सोसायटी ऑफ कॅटॅरॅक्ट सर्जनचे अध्यक्ष डॉ. हॉवर्ड फाइन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगत डोळ्यांच्या प्रक्रियेत त्यांचा प्रवास सुरू झाला.

उल्हासनगरात जीआयएस मॅपिंग डाटाबेस सर्वेक्षण: महापालिकेचा महाराष्ट्र रिमोट सेन्सिन सेंटर सोबत करारनामा

■उल्हासनगर। भावना जैन,

शहरातील जीआयएस मॅपिंग डाटाबेस सर्वेक्षण तयार करण्यासाठी महापालिका व राज्य शासनाच्या महाराष्ट्र रिमोट सेसिंग सेंटर विभाग यांच्यात सामंजस्य करार झाल्याची माहिती आयुक्त अजीज शेख यांनी दिली. त्यामुळे मंजूर विकास आराखड्यानुसार विकास योजना राबवण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे बोलले जात आहे.

उल्हासनगरच्या विकास आराखड्यात दर्शविलेले रस्ते, आरक्षणे विकसित करतांना सुक्ष्म पद्धतीने विकास योजनेचे वाचन करता येत नाही. त्यामुळे सुखसुविधा देतांना महापालिकेला विविध अडचणीला सामोरे जावे लागते. त्यासाठी सुक्ष्म प्रध्दतीने जीआयएस डाटाबेस तयार करणे आवश्यक असल्याने, सहाय्यक संचालक नगररचनाकार ललित खोब्रागडे व नगररचना विभागाने पुढाकार घेवून महाराष्ट्र रिमोट सेन्सिन सेंटर यांच्या सोबत सामंजस्य करार केला आहे. हा करार करताना महानगरपालिका आयुक्त अजीज शेख, सहायक संचालक नगररचना

ललित खोब्रागड व सेंटरचे सायंटिस्ट डॉ.आनंद शाक्य उपस्थित होते. या करारान्वये ड्रोन सर्वेक्षण करुन सुक्ष्म प्रध्दतीने संपूर्ण शहराचा डाटाबेस तयार करण्यात येईल, तसेच अनधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता ज्या अडचणी येतात.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

दारिद्र्याशी झुंज

कोविडच्या उत्तम दर्जेदार शिक्षण, कौशल्यविकास, चांगले आरोग्य आणि रोजगाराच्या संधी या सूत्रावर भर द्यावा, तरच शाश्वत विकासाचे उद्दिष्ट गाठता येईल. देशाच्या राजकारणात 'डेटा'ला अनन्यसाधारण महत्त्व असते, याची प्रचिती सध्या जेवढी येत आहे, तेवढी क्वचितच कधी आली असेल. एका अर्थाने ही चांगली गोष्ट असली तरी विश्वासार्ह आकडेवारी,ती मिळण्याची योग्य साधने आणि त्यांचा अन्वयार्थ लावण्याची पद्धत यांविषयी अभ्यासक, अर्थतज्ज्ञ आणि जिज्ञासू यांच्यात मतभेद होतात. तरीदेखील नीती आयोगाने नुकत्याच सादर केलेल्या आकडेवारीने काही राज्यांतील दारिद्र्यनिर्मूलनात घट झाल्याचे दिसते, ही बाब दखलपात्र ठरते. भौतिक सुविधा आणि आरोग्य, शिक्षण यांसारख्या राहणीमान उंचावण्यासाठीच्या घटकांची गरिबीत जगणाऱ्यांना उपलब्धता वाढली की, साहजिकच त्यांच्या जगण्याच्या गुणवत्तेत सुधारणा होते. देशाच्या 'नीती आयोगा'ने प्रसिद्ध केलेल्या 'भारतातील बहुआयामी गरिबी (एमडीपीआय) २००५-०६ पासून' या अहवालात त्याचे प्रतिबिंब उमटले आहे. संयुक्त राष्ट्रांनी घालून दिलेल्या निकषांच्या आधारे हे मूल्यमापन करण्यात आले आहे.

अहवालातील निरीक्षणांवर नजर टाकल्यावर गेल्या सुमारे अठरा-वीस वर्षांत झालेले बदल आणि त्याचे सुपरिणाम यांची प्रचिती येते. या अहवालानुसार, २५ कोटी जनता गरिबीतून बाहेर आली असून, सुमारे २४ कोटी अद्यापही गरिबीत आहेत. येत्या २०३०पर्यंत गरिबीच्या उच्चाटनाचे उद्दिष्ट आहे. २००५-०६ मध्ये देशात ५५ टक्के गरीब होते, त्याचे प्रमाण २०१५-१६मध्ये २४.८५टक्के झाले, २०१९-२०मध्ये ते घटून १९टक्क्यांवर पोचले. बिमारू, मागास, विकासात पिछाडीवर, उपेक्षित असे उपेक्षेचे शिक्के भाळी असणाऱ्या राज्यांनी या कालावधीत गरिबीतून बाहेर पडण्यात चांगली कामगिरी बजावली, ही समाधानाची बाब. या कालावधीत उत्तर प्रदेशात ५.९४ कोटी, बिहारात २.७७ कोटी आणि मध्य प्रदेश (२.३० कोटी) या राज्यातील जनतेने गरिबीतून बाहेर पडण्यात चांगले यश मिळवले आहे. महाराष्ट्राची कामगिरीही उत्तम आहे. महाराष्ट्रात २००५-०६मध्ये ४० टक्क्यांवर असलेली गरिबी घटून २०१९-२०मध्ये आठ टक्क्यांच्या जवळपास पोचली.

गरिबी म्हणजे काय? ती मोजायची कशी? दरडोई उत्पन्नाशी त्याची सांगड घालायची की, बहुआयामी गरिबी निदेर्शांकाच्या (एमपीआय) मोजपट्टीने मूल्यमापन करून त्यावर शिक्कामोर्तब करायचे, हा सातत्याने अर्थतज्ज्ञ आणि समाजसेवी संस्था यांच्यात चचेर्चा व वादाचा मुद्दा राहिलेला आहे. 'नीती आयोगा'ने सादर केलेल्या ताजा अहवालानंतर अशा स्वरुपाचा वादाला आणि मतभेदाला तोंड फुटू शकते. टीकाही होऊ शकते. तरीही शाश्वत विकासाचे उद्दिष्ट (एसडीजी) समोर ठेवून केलेली वाटचाल गरिबी हटवते की नाही, यापेक्षा जनतेचे एकूण राहणीमान उंचावते का, हेही तपासणे अगत्याचेच आहे. त्याशिवाय गरिबीवर केलेली मात निदर्शनालाही येणार नाही. यूपीए सरकारच्या काळात अन्नसुरक्षा कायदा करून त्याची कार्यवाही सुरू झाली. ऐंशी कोटी जनतेला मोफत अन्नधान्य पुरवले जात आहे. नेमके त्यावर बोट ठेवून टीकाकार मोदी सरकारला नाकर्ते ठरवते आहे. पण ते अर्धसत्य म्हणावे लागेल. मात्र, बहुआयामी गरिबी निदेर्शांकाची मोजपट्टी तशी व्यापक आहे. स्वयंपाकाचे इंधन आणि घरांची उपलब्धता या आघाडीवर चाळीस टक्क्यांवर जनता उपेक्षित आहे; तथापि बालमृत्यू रोखणे, विजेची उपलब्धता, बँक खाते यांच्या सार्वत्रीकरणात आपण मोठी मजल मारली आहे.

आरोग्य, शिक्षण आणि राहणीमान यांच्याशी निगडित दहावर निकषांबाबत आपण समाधानकारक वाटचाल केलेली आहे. त्याच्या कारकत्वाचे श्रेय सरकारच्या पीएम पोषण, उज्जवला गॅस, पीएम गरीब कल्याण अन्न योजना, स्वच्छ भारत अभियान, जलजीवन मिशन, पीएम जनधन आणि पीएम आवास अशा कितीतरी योजनांना जाते. या योजना आणि त्यांचे लाभ समाजाच्या तळागाळातील जनतेपर्यंत थेट पोचल्या, असा दावाही सरकारने केला आहे. सरकारच्या थेट लाभार्थींपर्यंत पोचण्याच्या प्रयत्नांमुळेच हे साधले आहे. ही कामगिरी समाधानाची असली तरी शाश्वत विकासाच्या उद्दिष्टाच्या पूर्ततेत आपल्याला मोठी मजल गाठायची आहे, हेही वास्तव ध्यानात घ्यावे. गरिबीच्या मोजमापासाठी बहुआयामी गरिबी निदेर्शांक पूर्णतः ग्राह्य धरता येत नाही. दरडोई उत्पन्न हेदेखील विचारात घ्यावे लागते, त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही, असे कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. त्यांच्या या सूचनांकडे साफ दुर्लक्ष करणे गैरच. जागतिक भूक निदेर्शांकामध्ये भारताची कामगिरी असमाधानकारक नोंदवली गेली. त्यावरून देशातील सत्ताधाऱ्यांनी संबंधित अहवालावर झोडही उठवली. त्यामुळेच दारिद्र्यरेषेची निश्चिती आणि त्याचे स्वरूप ठरवण्यासाठी विद्यमान सरकारने उचललेले पाऊल अडखळले आहे, त्याची पूर्तता केली तर सरकारच्या दावे आणि कामगिरीवर घेतल्या जाणाऱ्या शंकांना उत्तर मिळू शकेल.

5 DELICIOUS WAYS TO INCLUDE FIBRE IN YOUR WINTER DIET

Fibre is an essential component of a balanced diet and is needed to facilitate better bowel movements, help one feel full, regulate blood sugar levels, apart from reducing risk of several chronic diseases like diabetes and cardiovascular illness. In winter, the role of fibre acquires even bigger significance due to increased chances of digestive distress like constipation and bloating, and appetite slightly on a higher side. Food cravings during the cold weather can lead one to indulge in high-fat and sugar treats which could spell trouble for people with heart diseases, diabetes, blood pressure and fatty liver issues. Dietary fibre promotes feeling of satiety and thus can prevent one from over-indulging and gaining weight. Dietary fibre or roughage which usually includes plant-based foods like seasonal fruits and vegetables, legumes, nuts and seeds is rich in antioxidants and has anti-inflammatory properties. Around 25 grams of fibre is recommended for adults for overall well-being and gut health. Fibre adds bulk to the stool and ease digestive health. A good gut health can have a positive effect on all body functions including brain health. Fruits and vegetables, oats, millets, barley, flaxseed, psyllium, lentils, peas, spinach, orange are some of the examples of food that are high in dietary fibre. "In winter it's important to fuel our bodies with healthful foods that promote general well-being in addition to providing warmth. Dietary fibre, which is essential for maintaining a balanced diet and digestive health, is one important component that is frequently ignored," says Nutritionist, Apurva Agarwal in an interview with HT Digital.

WAYS TO ADD FIBRE TO YOUR WINTER DIET

Here are 5 delicious and healthy methods to add fibre to your winter meals, suggested by Agarwal.

1. Warm up with fibre-rich soups : Try a creamy split pea version or a hearty lentil and vegetable soup. Add some beans, quinoa, or whole grains, like barley, to up the fibre content. Use winter vegetables like carrots, sweet potatoes, and kale to enhance flavour and multiply benefits. Spice it up with herbs and spices for added taste. These warming soups can support digestive health.

2. Mixed winter salad : Mix high-fibre ingredients such as pomegranate seeds, quinoa, roasted sweet potatoes, and kale to make a delicious salad that is perfect for winter. Add some crunch to the walnuts for texture, then dress with a bright citrus vinaigrette. This delicious recipe will warm you up and satisfy your wintertime desires while simultaneously increasing your intake of fibre and supporting digestive health.

3. Fibre-rich baked treats : Savour wholesome whole grain muffins, oatmeal cookies enriched with flaxseeds, or banana bread filled with bran. Try these fibre-rich pumpkin spice scones or sweet potato muffins to up your comfort food game. Savoury choices like whole grain quiche with spinach and feta should not be overlooked. In addition to fulfilling your appetites, these delectable bakes guarantee a warm, high-fibre winter diet for a contented, healthy you.

4. Roasted vegetables high in fibre : Roasted vegetables high in fibre will boost your wintertime nutrition. Combine hearty staples like sweet potatoes, brussels sprouts, and carrots. Roast till perfectly done, then drizzle with olive oil. The pleasant crunch and warmth give these veggies a delicious fibre boost. Serve alongside lean proteins for a hearty winter feast that nourishes your body and satisfies your taste buds.

5. Comforting whole grain breads : Comforting whole grain breads will warm you through the cold and satisfy your taste senses while increasing your intake of fibre. Indulge in substantial, handmade multigrain bread or opt for a comfortable cup of oatmeal topped with nuts and fruits. For a savoury twist, have avocado toast on whole wheat or rye bread. These mouthwatering choices give you the necessary elements for a healthy winter diet in addition to keeping you warm.

आरोग्यासाठी कॉफी आणि चॉकलेट किती फायदेशीर?

आयुर्वेदात मूड चांगला असेल तर चॉकलेट आणि चांगला नसेल तरी चॉकलेट. प्रेमापासून ते प्रपोज करण्यापर्यंतचा प्रवास चॉकलेटनेच सुरु होतो. हेच कॉफीबाबत सांगता येईल. तर तुम्ही सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत कॉफी पिण्याचे कोणतं ना कोणतं कारण असतं. पण तुम्हाला माहित आहे का की, चॉकलेट आणि कॉफी आणि शरिरीसाठी किती फायदेशीर आहे? किंवा शरिरासाठी किती घातक आहे? तुम्हाला यापैकी एक किंवा दोन्ही गोष्टींचे व्यसन लागले असेल तर ते तुमच्यासाठी घातक ठरु शकतं. एखाद्या व्यक्तीला 4 कप कॉफी प्यायल्यानंतर जेवढे कॅफिन मिळते. तेवढेच 7 चॉकलेट खाल्ल्यानंतर त्या व्यक्तीला कॅफीन मिळते.

कॉफी पिण्याचे फायदे

कॉफीमध्ये कॅफिन असते. कॅफिनमुळे शरीराला ऊर्जा मिळते. याशिवाय एक कप कॉफीने थकवाही दूर होतो. कॉफी प्यायल्याने शरीरातील चयापचय दर 10 टक्क्यांनी वाढतो, ज्यामुळे वजन कमी होऊ शकते.

चॉकलेट खाण्याचे फायदे

लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनाच चॉकलेट खायला आवडते. डार्क चॉकलेट, व्हाइट चॉकलेट, मिल्क चॉकलेट असे अनेक प्रकारची चॉकलेट्स बाजारात उपलब्ध आहेत. डार्क चॉकलेटमध्ये फायबर, लोह, कॉपर इत्यादी घटक असतात. पण काही चॉकलेट खाल्ल्याने तुमच्या शरीरावर वाईट परिणाम होऊ शकतात. डार्क चॉकलेट खाल्ल्याने तुमचे हृदयही निरोगी राहते कारण डार्क चॉकलेट खाल्ल्याने रक्तप्रवाह सुधारतो. चॉकलेटमधील ट्रिप्टोफॅन मेंदूतील एंडोर्फिनची पातळी वाढवण्यासाठी प्रभावी आहे.

चॉकलेट शरिरासाठी घातक

चॉकलेट जर अतिप्रमाणात खाल्ले तर पोटासाठी खूप हानिकारक ठरु शकते. ज्यांना नेहमी ॲसिडची समस्या असते त्यांच्यासाठी चॉकलेट धोकादायक मानले जाते. यामध्ये कॅफीन आणि थिओब्रोमाइनसारखे पदार्थ असतात, ज्यामुळे ॲसिडचे कारण ठरु शकतात. तसेच यामध्ये फॅटचे प्रमाण देखील भरपूर असतात, ज्यामुळे ॲसिड तयार होते.

कॉफी

काही लोकांना सकाळी उठल्याबरोबर कॉफी पिण्याची सवय असते. काही लोक ऑफिसमध्ये जाऊन कॉफी घेतात. रात्री झोपण्यापूर्वी मित्रांसोबत गप्पा मारणे, व्यायाम करणे आणि कॉफी पिणे. तुम्ही किती कॉफी पितात याचा विचार केला तर तुमच्या आरोग्यावर किती अन्याय होतोय हे लक्षात येईल. दिवसभरात एक कप कॉफी किंवा चहा पिणे चांगले. पण जास्त प्रमाणात सेवन केल्यास ॲसिडिटीचा त्रास होऊ शकतो. कारण कॅफिनचे प्रमाण जास्त असते. कॅफिनच्या सेवनामुळे गॅस्ट्रिक ॲसिड स्राव वाढतो. ज्यामुळे ॲसिडिटी होते. त्यामुळे कधीही रिकाम्या पोटी चहा किंवा कॉफी पिऊ नका.

'रामायण' मालिकेतील कलाकार अयोध्येत दाखल; राम, सीता आणि लक्ष्मणाचं केलं जंगी स्वागत

'पुढचं अयोध्येत भगवान श्री रामाचे भव्य मंदिर उभारले जात आहे. रामललाच्या अभिषेकाची रूपरेषा निश्चित करण्यात आली असून, मुख्य अभिषेक सोहळा 22 जानेवारी रोजी होणार आहे. परंतु 15 जानेवारीपासूनच पूजा आणि विधी यासारखे कार्यक्रम सुरु झाले आहेत. 22 जानेवारी रोजी दुपारी प्रभू श्री रामाच्या प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम होणार आहे. प्राणप्रतिष्ठा दरम्यान, राम मंदिराच्या गर्भगृहात केवळ पाच लोक उपस्थित राहणार आहेत, ज्यामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख यजमान असतील. तसेच, फार प्रमुख मोहन भागवत, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राम मंदिराचे मुख्य पुजारी आचार्य सत्येंद्र दास यांचा समावेश असेल.

22 जानेवारी 2024 रोजी सकाळी 12.29 ते 12:30 पर्यंत राम मंदिरात राम लल्लाची मूर्ती स्थापन करण्याची वेळ असेल. प्राणप्रतिष्ठेसाठी केवळ 84 सेकंदांचा शुभ मुहूर्त असेल. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी अनेक दिग्गज कलाकार आणि नेते मंडळी यांना देखील आमत्रंण देण्यात आलं असून, 'रामायण' फेम अभिनेते अरुण गोविल देखील यावेळी उपस्थित असणार आहेत.

अश्यातच आज अयोध्येत मालिकेत राम, सीता आणि लक्ष्मणाची भूमिका साकारणारे कलाकार म्हणजेच ह्यअरुण गोविल, दीपिका चिखलिया आणि सुनील लहरीह्न यांचं अयोध्येत जंगी स्वागत करण्यात आलं. त्यांच्या स्वागताचा व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आला आहे. आज हे कलाकार अयोध्येत दाखल झाले असून, यावेळी मोठ्या उत्साहात त्यांचं स्वागत केलं गेलं.

सई लोकूरच्या लेकीचं बारसं झालं, नावाचा अर्थ आहे फारच खास

मराठमोळी अभिनेत्री सई लोकूर काही दिवसांपूर्वीच आई झाली आहे. सईने डिसेंबर महिन्यात गोंडस बाळाला जन्म दिला. सोशल मीडियावरून सईने कन्यारत्नाची प्राप्ती झाल्याची माहिती चाहत्यांना दिली होती.

चिमुकलीच्या आगमनाने सई आणि तीर्थदीप आनंदी आहेत. नुकतंच सईने तिच्या लाडक्या लेकीचं नावही ठेवलं आहे. सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत सईने याची माहिती चाहत्यांना दिली आहे. सईने पती आणि लेकीबरोबरचा एक गोड फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. सई आणि तीर्थदीपने त्यांच्या लाडक्या लेकीचं नाव ताशी असं ठेवलं आहे. या नावाचा अर्थही तिने पोस्टमध्ये सांगितला आहे. आम्ही एक महिन्याचे झालो.

HEALTH AND SPORTS

"I DON'T SEE THIS SERIES AS A SELECTION SERIES FOR THE WORLD CUP": PARTHIV PATEL ON AFGHANISTAN SERIES

Dubai: Former India wicketkeeper-batsman Parthiv Patel feels that the Afghanistan T20I series is not a selection series ahead of the ICC T20 World Cup 2024. He also feels the inclusion of Virat Kohli and Rohit Sharma in the Indian side indicates their selection for the World Cup squad. The stars of the Indian cricket team Virat Kohli and Rohit Sharma have returned to the the T20I format after almost a year. Indian skipper Rohit could not score runs in the first two games as he departed for ducks. Virat Kohli featuring in the second T20I scored 29 off 16 deliveries. "I don't see this series as a selection series for the World Cup. I don't think any player performing or not will impact their chances of World Cup selection, specially when you are talking about Rohit Sharma or Virat Kohli. Once you have picked them for the series, it means they are going for the World Cup. For Rohit Sharma personally, he would like to score runs. He likes to set the tone and if he gets in, he would like to make it a big one," Partiv said as quoted from JioCinema. In the first two games, the hosts showcased a stupendous show and secured a lead of 2-0 over Afghanistan. Shivam Dube shone brightly in both games by scoring 60 runs in the first match and 63 runs in the second innings. He also picked one wicket in each match.

RISHABH PANT'S CAMEO IN INDIA'S TRAINING SESSION PAINTS A WORRISOME PICTURE. HERE'S WHY

NEW DELHI : On the long road to recovery, wicketkeeper-batter Rishabh Pant was seen having an animated chat with former India skipper Virat Kohli and captain Rohit Sharma on the sidelines of the 3rd T20I against Afghanistan. Shivam Dube-starrer Team India will meet the visitors for the third and final T20I of the series on Wednesday at the M.Chinnaswamy Stadium. Hosts India have arrived in Bengaluru after taking an unassailable 2-0 lead over the Rashid Khan-less side. Recovering at the National Cricket Academy (NCA), Pant is tipped to make his return for the Delhi Capitals (DC) in the 2024 edition of the Indian Premier League (IPL). The DC southpaw and franchise skipper sustained multiple injuries in a serious car accident about 13 months ago. Donning a casual Jordan t-shirt and black shorts, Pant did some shadow batting, and the wicketkeeper also received throwdowns from members of the NCA. Pant showcased his batting for some 20 minutes in the Chinnaswamy nets before members of the Indian team arrived at the venue for match fitness. Pant also greeted power-hitter Rinku Singh while interacting with several members of the Indian team. As per the visuals, Pant didn't look 100% as the gloveman hobbled a bit while making a brief appearance at the M Chinnaswamy Stadium.

YUVRAJ MADE TECHNICAL CHANGES TO MY BATTING, LARA TAUGHT ME TACTICS: ABHISHEK SHARMA A BIG SEASON AWAY FROM INDIA DREAM

NEW DELHI : "Fad jara ehnu," tweeted Yuvraj Singh in Punjabi a couple of hours after Shubman Gill smashed 96 off 59 to lead Gujarat Titans to a hard-fought win against Punjab Kings. It loosely translates to "catch him, man". The message was for Abhishek Sharma. Yuvraj, the Player of the Tournament in India's 2011 World Cup-winning campaign wanted Abhishek to match Gill's exploits. The next day, Abhishek responded with a 50-ball 75 in Sunrisers Hyderabad's eight-wicket victory against Chennai Super Kings and dedicated the knock to Yuvraj. A lot has changed since IPL 2022. Gill has rapidly made his mark in every format of the game, whether in blues or whites. Abhishek too has continued a steady growth in his career but "catching Gill" would need more work... More runs. More wickets. Gill and Abhishek go back a long way. They both made their first-class debut for Punjab in the same season in 2017 before going on to play for India in the U19 World Cup next year. Gill went on to score most runs for India in that tournament and life was never the same for him. Gill was the breakaway star of India's winning campaign but Abhishek's all-round talent didn't go unnoticed either. The left-handed batter, who is more than a handy finger spinner, is delighted to see Gill make a mark in international cricket but is not a believer in "chasing" his friend anymore. "I'm very happy for him. We are good friends," Abhishek told Hindustan Times in an exclusive chat.

A 30-MINUTE WALK CAN REDUCE BLOOD PRESSURE IN WOMEN WITH RHEUMATOID ARTHRITIS, FINDS STUDY

A study has recently found that women with rheumatoid arthritis experienced a brief drop in blood pressure during a 30-minute walk at a moderate intensity, both at rest and during stressful situations. An inflammatory autoimmune condition that affects the synovial joints and results in pain, swelling, and eventual physical disability is called rheumatoid arthritis. In addition to having high blood pressure, those with rheumatoid arthritis have been found to have a 50% higher chance of dying from cardiovascular disease than the general population. BP is also known to rise in rheumatoid arthritis patients in response to mental stress, physical effort, and pain, contributing to the high risk of cardiovascular complications of the disease. The study "shows that exercise prevented a rise in blood pressure," among women with rheumatoid arthritis, said Tiago Pecanha, a researcher at University of Sao Paulo's (USP) Medical School (FM-USP) in Brazil. In a 24-hour monitoring test, the team showed that exercise lowered systolic pressure by 5 mmHg on average. "This amount of reduction is significant, correlating with a 14 per cent lower risk of death from stroke, a 9 per cent lower risk of death from coronary arterial disease, and a 7 per cent lower risk of all-cause death for people with hypertension," Pecanha explained. In the study, published in the Journal of Human Hypertension, the team analysed 20 women volunteers aged between 20 and 65 and diagnosed with rheumatoid arthritis and hypertension. The women were first involved in a pre-intervention measurement of blood pressure and heart rate at rest and in response to different types of stress. In the second session, a randomly selected group walked at moderate speed on a treadmill for 30 minutes, while a control group stood on the treadmill for 30 minutes without performing any exercise. Both groups had their blood pressure measured before and after the session. After exercise or rest, they took tests involving stress (a cognitive stress test and a pain tolerance test) that could affect their blood pressure. Systolic blood pressure remained stable in all 20 women before and immediately after the treadmill session but was higher in the measurements made while they were resting. "The temporary effect of just one aerobic exercise session is very important since acute reductions in blood pressure on several consecutive days are expected to accumulate and lead to a sustained reduction over time, contributing to better control of hypertension in rheumatoid arthritis," Pecanha said. On the day of the 30-minute walk, systolic pressure fell by 1 mmHg on average. On the day when they remained at rest, it rose by 4 mmHg. Pecanha said that the findings can also be applied to other autoimmune inflammatory diseases, such as lupus, psoriatic arthritis, inflammatory myopia, and juvenile lupus.

6 WAYS NANOPLASTICS AFFECT OUR HEALTH FROM HEART ISSUES TO COGNITIVE DECLINE

Incredibly tiny, nanoplastics the invisible invaders, that make their way into our body through food or by way of inhalation, are believed to be posing a grave threat to our health. A recent research shed light on how a 1 litre bottle of water contains more than 2 lakhs of nanoplastic fragments that can enter the bloodstream, cause change in gut microbiota, inflammation and even cognitive decline. The researchers from Columbia University used a new microscopic technique to detect these particles measuring 1 micrometre in length, 70 times smaller than the size of a hair strand, and the findings only prove how grossly we have underestimated the presence of these tiny villains in our food, cosmetics, clothing, environment et al. One microplastic particle can break down into billions of nanoplastic particles, making their entry easier in the bloodstream, various organs, brain and even in the placenta of the unborn baby. As the plastic menace intensifies, the impact of microplastic and nanoplastics in the human body needs to be more extensively studied. Our immune system may treat microplastics or nanoplastics as invaders and considering they don't break down in the body and keep accumulating, they may cause chronic inflammation. When persistent, this inflammation can affect heart, kidneys and may even cause diabetes. Being indestructible, these nano particles of plastic would keep accumulating in the body, causing health issues that are even difficult to predict at this point.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

दुर्गंधी, गलिच्छपणा अन् धुळीच्या लोटामुळे प्रवासी हैराण; तरीही पनवेलला स्वच्छ स्थानकाचा मान

■पनवेल। प्रतिनिधी,

स्वच्छतागृहांबाहेर आणि फलाटांवर चालताना जाणवणारी दुर्गंधी... प्रवेशद्वारांवर गलिच्छ भिकारी, गर्दुल्ल्यांचा वावर... स्थानक परिसरातील कामांमुळे उडणारे धुळीचे लोट... अशा अस्वच्छ वातावरणाने पनवेल रेल्वे स्थानकाला विळखा घातला आहे. लांब पल्ल्याच्या गाड्या दाखल होणाऱ्या रेल्वे स्थानकाची अस्वच्छता आणि अव्यवस्था यामुळे प्रवासी हैराण झाले आहेत. परंतु त्याच पनवेल रेल्वे स्थानकास मध्य रेल्वेच्या 'अ' दर्जाच्या स्थानकांमधील सर्वांत स्वच्छ स्थानकाचा सन्मान देण्यात आला आहे. स्थानकातील परिस्थिती आणि मिळालेला गौरव यातील विरोधाभासामुळे स्थानिक प्रवाशांकडून मात्र याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

ठाणे, विरार, अंधेरी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आदी लोकल स्थानकांसह देशातील महत्त्वाच्या मोठ्या स्थानकांमध्ये धावणाऱ्या शेकडो पॅसेंजर आणि लांब पल्ल्याच्या गाड्या पनवेल स्थानकातून धावतात. जेएनपीटीला देशाशी जोडणाऱ्या मालवाहू रेल्वेमुळे देशभर ख्याती असलेल्या पनवेल रेल्वे स्थानकात प्रवाशांची नेहमीच वर्दळ असते. मुंबई महानगर प्रदेशातील महत्त्वाचे रेल्वे स्थानक असलेल्या या स्थानकास मध्य रेल्वे प्रशासनाने स्वच्छतेसाठी सन्मानित केले. परंतु या रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांनी या स्वच्छ स्थानकाच्या कौतुकावरून संताप व्यक्त केला आहे.

पनवेल स्थानकातून जुन्या पनवेल दिशेला जाणाऱ्या मार्गावरील अस्वच्छ स्वच्छतागृह, थुंकीबहाद्दरांनी रंगवलेल्या भिंती आणि धुळीमुळे निर्माण होणारे प्रदूषण यामुळे या भागातून प्रवास करणारे प्रवासी असंख्य समस्यांनी ग्रस्त आहेत. विशेष म्हणजे लांब पल्ल्याच्या गाड्या थांबणाऱ्या रेल्वे रुळांवरील दुर्गंधीमुळे फलाटांवर उभे राहणेही प्रवाशांसाठी अडचणीचे ठरते आहे. रेल्वे स्थानकातून बाहेर पडल्यानंतर त्या ठिकाणी भिकारी, गर्दुल्ले, रिक्षाचालकांचा कोंडाळा यामुळे येथे येणाऱ्या प्रवाशांचा गोंधळ उडतो. ही परिस्थिती कधी सुधारणार, असा प्रश्न येथे येणाऱ्या प्रवाशांना सतावतो.

ठेकेदाराने पालिका अधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करून पैसे काढले

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील तीन अधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करून महापालिकेच्या लेखा विभागाकडून ५ लाख १० हजार २५१ रुपये सुरक्षा अनामत रक्कम काढून घेतल्याचा आरोप भाजपा ठाणे शहराध्यक्ष संजय वाघुले यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी पालिका आयुक्तांना निवेदन देऊन तिघांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून संबंधित ठेकेदार कंपनीला तत्काळ काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे. ठाणे महापालिकेच्या वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रातील विविध शौचालयांची दुरुस्तीच्या कामाचा ठेका जान्हवी कन्स्ट्रक्शनचे मालक संजय घोसाळकर यांना २०१७ मध्ये देण्यात आला होता. १ कोटी ७७ लाख ५२ हजार रुपयांचा ठेका होता. या ठेक्यासाठी कंपनीने महापालिकेत ५ लाख १० हजार २५१ रुपयांची अनामत रक्कम जमा केली होती. महापालिकेचे कनिष्ठ अभियंता सुधीर सोनवणे, उप अभियंता शैलेंद्र चारी आणि कार्यकारी अभियंता प्रकाश खडतरे यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून अनामत रक्कम काढून घेण्यात आली आहे. याप्रकरणी भारतीय भ्रष्टाचार निवारण संस्थेने केलेल्या तक्रारीच्या आधारे पालिकेने चौकशी केली. यामध्ये या स्वाक्षऱ्या अजित सिंग, अभिषेक सिंग आणि संतोष पवार यांनी केल्याचे स्पष्ट झाले आहे, असा दावा वाघुले यांनी केला आहे. जान्हवी कन्स्ट्रक्शनचे मालक संजय घोसाळकर यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. तसेच लेखा व वित्त विभागाने १७ ऑगस्ट रोजी बनावट स्वाक्षऱ्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना कायदेशीर तक्रार दाखल करण्याचे सुचविले आहे.

दोघांचं पाच वर्षाचं प्रेम; एक टोकाचा निर्णय अन् सारचं संपलं..

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

सध्याच्या काळात प्रेमप्रकरणं खूप पाहायला मिळतात. मात्र याच प्रेमप्रकरणातून कधी कधी धक्कादायक कृत्यही घडतात. अशीच एक घटना नवी मुंबईतील कळंबोली परिसरातील घडलेली पाहायला मिळाली आहे. १९ वर्षीय वैष्णवी बाबर आणि २४ वर्षीय वैभव बुरुंगले यांची प्रेमकहाणी अंगावर काटा आणणारी आहे. हे दोघेही कळंबोली परिसरात राहत होती. एक दिवशी १९ वर्षीय ही तरुणी आईला कॉलेजमध्ये जाते असे सांगून गेली आणि घरी आलीच नाही.

या तरुणीचा मृतदेह खारघरच्या जंगलामध्ये पोलिसांना आढळून आला. पोलिसांनी चौकशी केल्यानंतर तरुणीचे एका मुलासोबत पाच वर्षांपासून प्रेम संबंध होते. मात्र काही क्षुल्लक कारणांवरून दोघांमध्ये वाद झाले. त्यानंतर मुलीने हे रिलेशन नको, असा निर्णय घेतला. त्यावरून दोघांमधला वाद टोकाला गेला. प्रियकराने रागाच्या भरात मुलीची गळा दाबून हत्या केली. प्रियकराने देखील एक चिठ्ठी लिहून स्वतः ट्रेन मधून उडी घेत स्वतःचे आयुष्य संपवलं. त्यांनं चिठ्ठीमध्ये लिहिले की, मी वैष्णवीची हत्या केली आहे. मी स्वतःही आत्महत्या करत आहे. याला कोणालाही जबाबदार धरू नये असं त्यानं चिठ्ठीत लिहिलं होतं. त्यावरून हा खुलासा झाला.

त्यानंतर पोलिसांनी ड्रोनच्या सहाय्याने मुलीचा शोध घेतला तर खारघरच्या जंगलामध्ये या मुलीची बॉडी आढळून आली असल्याचे क्राईम ब्रँचचे अमित काळे यांनी सांगितले. कळंबोली पोलीस ठाण्यामध्ये वैष्णवी मनोहर बाबरही मुलगी कॉलेजला जाते असे सांगून घरातून निघून गेली होती. ती घरी परत न आल्याने तिच्या आईने ती हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने पोलिसांनी शोध घेतला. मात्र त्याच दिवशी त्या मुलीचा प्रियकर वैभव बुरुंगले याने जुईनगर रेल्वे स्टेशन येथे रेल्वेखाली आत्महत्या केली होती.

KDMC मधील माजी नगरसेवक दाम्पत्याचा भाजपला रामराम, शिंदेंच्या शिवसेनेकडून प्रवेशाची ऑफर

■डोंबिवली। प्रतिनिधी,

केडीएमसीचे माजी सभापती आणि डोंबिवली पश्चिमेतील भाजपचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे, त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका कविता म्हात्रे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह भाजप सदस्यत्व पदाचा राजीनामा दिला आहे. म्हात्रे यांनी मंगळवारी डोंबिवली पश्चिम भाजप अध्यक्ष समीर चिटणीस यांच्याकडे मंगळवारी हा राजीनामा सुपूर्द केला आहे.

म्हात्रे यांच्या या राजीनामा नाट्याने डोंबिवलीत खळबळ उडाली आहे. केंद्रात आणि राज्यात सत्ता असतानाही प्रभागात विकास कामासाठी निधी मिळत नसल्याने म्हात्रे यांसह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते नाराज असून याच नाराजीतून हा राजीनामा म्हात्रे यांनी दिल्याचे बोलले जात आहे.

विकास म्हात्रे यांनी शिवसेना (शिंदे गट) पक्षात यावे, आम्ही स्वागत करु, खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून भरघोस निधी मिळू शकतो, आमच्या पक्षात यावे, अशी खुली ऑफरच युवासेनाचे सचिव आणि केडीएमसी माजी सभापती दीपेश म्हात्रे यांनी दिली आहे..

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण लोकसभा मतदारसंघात अनेक राजकीय घडामोडी घडू लागल्या आहेत. कल्याण लोकसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गट व भाजपा यांच्यातील नाराजी ही उघड उघड वारंवार दिसून आली आहे. तर दुसरीकडे मनसे व ठाकरे गट देखील येथे सक्रिय झाले आहेत. असे असताना सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांना एक मोठा धक्का त्यांच्याच पक्षातील एका पदाधिकाऱ्याने दिला आहे.

भाजपचे माजी स्थायी समिती सभापती विकास म्हात्रे यांनी भाजप पक्षातील सदस्य पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी कविता म्हात्रे व काही कार्यकर्त्यांनी आपला सदस्य पदाचा राजीनामा दिला आहे. निवडणुका तोंडावर आल्या आहेत. प्रभागात विकास कामे करण्यासाठी निधी नाही. निधी नसल्याने रस्ते, गटारे इतर कामे होत नसल्याने प्रभागातील नागरिक, कार्यकर्ते तीव्र नाराज आहेत.

कळंबोलीत बेपत्ता विद्यार्थीनीचा प्रियकरानेच केला खून

■पनवेल। प्रतिनिधी,

एका महिन्यापासून १९ वर्षीय विद्यार्थीनी कळंबोलीतून बेपत्ता होती. अखेर मंगळवारी तीचा मृतदेह खारघरमध्ये निर्जनस्थळी सापडला. नवी मुंबई पोलीसांनी तीच्या हत्येचा तपास पुर्ण केल्याची माहिती बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. तीच्या प्रियकरानेच तीचा खून केल्याचे पोलीसांच्या तपासात समोर आले आहे. तसेच या गंभीर तपासात पोलीसांनी वैष्णवीचा शोध घेण्यासाठी ड्रोन कॅमेराचा वापर केल्याचे समोर आले. कळंबोलीत राहणारी वैष्णवी बाबर ही १२ डिसेंबरपासून महाविद्यालयात जाते सांगून घरातून बाहेर पडली ती घरी परतलीच नाही. वैष्णवी ही मुंबई (सायन) एसआयएस या महाविद्यालयात शिकत होती. वैष्णवी ज्या दिवसापासून बेपत्ता झाली त्याच दिवशी कळंबोली वसाहतीमधील २६ वर्षीय वैभव बुरुंगले हा बेपत्ता झाला होता. वैभव हा वैष्णवीचा प्रियकर होता अशी माहिती पोलीसांना मिळाली होती. १२ डिसेंबरला वैभव याचा मृतदेह जुईनगर रेल्वेरुळावर सायंकाळी पाच वाजता सापडला. अनेक दिवस वैष्णवी सापडत नसल्याने विशेष तपास पथक स्थापन करुन या प्रकरणाचा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे पोलीस आयुक्तांनी सोपविला होता. मरणापूर्वी वैभव याने मोबाईलमध्ये खून केल्याचे आणि आत्महत्या केल्याचे सांकेतिक भाषेत लिहून ठेवले होते. पोलीसांच्या पथकाने या सांकेतिक शब्दाचा उलगडा केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल आहेर यांचे पथक वैष्णवीचा शोध घेत होते. खारघरच्या डोंगररांगांमध्ये वैष्णवीचा शोध पोलीसांसोबत लोणावळ्याची शिवदुर्ग रेस्क्यू टीम, सिडकोचे अग्निशमन दल, वन विभाग यांचे कर्मचा-यांनी घेतल्यावर मृतावस्थेत वैष्णवी सापडली. वैष्णवी आणि वैभवचे काही वर्षांपासून प्रेम होते. वैष्णवी हीच्या घरातून लग्नाला विरोध असल्याने वैष्णवीने विभक्त होण्याचा विभक्त होण्याचा निर्णय घेतला होता. वैष्णवी ही आपल्याला यापूढे भेटणार नाही हे समजताच वैभवने वैष्णवी हीला अखेरच्या भेटीसाठी घराबाहेर बोलावले.

राज्य शासनाने भूमिका बदलली, वसईकरांमध्ये संताप; वसई विरार महापालिकेत २९ गावे कायम ठेवणार

■वसई। प्रतिनिधी,

वसई विरार महापालिकेतून २९ गावे वगळण्याऐवजी ही गावे महापालिकेतच कायम ठेवण्याची नवीन भूमिका शिंदे-फडणवीस सरकारने घेतली आहे. २०११ मध्ये वसई विरार महापालिकेतून २९ गावे वगळण्याचा शासन निर्णय विखंडीत करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे पत्र मंगळवारी शासनाने मुंबई उच्च न्यायालयात पत्र सादर केले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. शासनाच्या या भूमिकेमुळे गावे वगळण्याच्या आंदोलनाला मोठा धक्का बसला आहे.

वसई विरार महापालिकेतून २९ गावे वगळण्याचे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती जी.एस. पटेल आणि न्यायमूर्ती कमल काता यांच्या खंडपीठापुढे हे प्रकरण सुनावणीसाठी आले. गावे वगळण्याचा अंतिम निर्णय अपेक्षित असताना राज्य शासनाने न्यायालयात उपसचिव शंकर जाधव यांच्या स्वाक्षरीने एक पत्र सादर केले. ३१ मे २०११ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या सरकारने २९ गावे वगळण्याचा घेतलेला शासन निर्णय विखंडित करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत असल्याचे सांगितले. यापूर्वीच्या शासन निर्णय विखंडीत करण्यासाठी काय प्रक्रिया केली त्याची माहिती देण्यास न्यायालयाने सांगितले. त्यामुळे याचिके वरली पुढील सुनावणी आता १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. यामुळे या प्रकरणाला नवीन कलाटणी मिळाली आहे.

वसईत संतापाची लाट

शासनाच्या या भूमिकेमुळे वसईकरांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. आम्ही शासनाच्या विरोधात आता निषेध आंदोलने करणार आहोत. लवकरच त्याची दिशा ठरवली जाईल, असे गाव आंदोलनाचे नेते जॉन परेरा यांनी सांगितले. तत्काली मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गावे वगळण्यासाठी कॅबिनेट बैठकीत निर्णय घेतला. त्याला विधीमंडळात मान्यता मिळवली आणि नंतर राज्यपालांच्या स्वाक्षरीने अधिसूचना काढली होती. तो निर्णय आताचे सरकार कुठल्या आधारावर बदलत आहे, असा संतप्त सवाल ऍड जिमी घोन्साल्विस यांनी केला आहे.

ठाण्याच्या काही भागात शुक्रवारी पाणी नाही

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे महानगरपालिकेच्या स्वतःच्या योजना आणि स्टेम प्राधिकरणाकडून शहराला होणारा पाणी पुरवठा दुरुस्ती कामासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. यामुळे शहरातील काही भागांचा पाणीपुरवठा शुक्रवारी चोवीस तासांसाठी बंद राहणार आहे. या बंदमुळे पुढील एक ते दोन दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असल्याने नागरिकांना पाणी टंचाई समस्येला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.ठाणे महापालिका क्षेत्रात चार स्त्रोतांमार्फत दररोज ५८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो.

त्यात महापालिकेच्या स्वतःच्या योजनेतून २५० दशलक्षलीटर, स्टेम प्राधिकरणाकडून ११५ दशलक्षलीटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्षलीटर आणि मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे हे सर्वच स्त्रोत शहरातील पाणी पुरवठ्याच्या दृष्टीकोनातून महत्वाचे मानले जातात. ठाणे महानगरपालिकेच्या स्वतःच्या योजना आणि स्टेम प्राधिकरणाकडून देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत.

कल्याण शहरातील २२ रस्त्यांवर वाहने उभी करण्यास वाहतूक विभागाकडून प्रतिबंध



■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण रेल्वे स्थानक भागात मागील तीन वर्षापासून स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत सुरू असलेली उड्डाण पुलाची कामे, रेल्वे स्थानक भागात रस्ते अडवून बसणारे फेरीवाले, बाजारपेठांमध्ये कल्याण शहरा बाहेरून येणाऱ्या वाहनांची संख्या वाढल्याने कल्याण शहरात वाहने उभी करण्याची समस्या गंभीर झाली आहे. शहरात वाहन कोंडीचे प्रमाण वाढल्याने वाहतूक विभागाने येथील २२ रस्त्यांवर वाहने उभी करण्यास बुधवार पासून वाहन चालकांना प्रतिबंध केला आहे. तर, १५ रस्त्यांवर वाहने उभी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड यांनी यासंदर्भातची अधिसूचना मंगळवारी जाहीर केली. २२ रस्त्यांवर वाहने उभी करण्यास प्रतिबंध करण्यात आल्याने याविषयी कोणाला काही हरकत असेल तर त्यांनी वाहतूक विभागाच्या ठाणे कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन उपायुक्त डॉ. राठोड यांनी केले आहे. कल्याण पश्चिमेत रेल्वे स्थानक भागात दिवंगत दिलीप कपोते हे एकमेव वाहनतळ आहे. कल्याण शहर परिसरातून नोकरीसाठी रेल्वेने जाणारा बहुतांशी नोकरदार आपल्या दुचाकी, चारचाकी वाहने रेल्वे स्थानक भागातील वाहनतळ, रस्त्यांवर उभी करून इच्छित स्थळी जातो. ही वाहने तो कपोते वाहनतळात उभी करून ठेवतो. या वाहनतळाची क्षमता दाखल होणाऱ्या वाहनांपेक्षा कमी असल्याने बहुतांशी वाहन चालक आपली चारचाकी, दुचाकी कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागातील गल्लीबोळ, अरूंद रस्ते, इमारती, सरकारी कार्यालयाच्या आडोशाने उभी करून ठेवतात. ही वाहने वाहतुकीला अडथळा ठरत आहेत. या वाहनांच्या बाजुला फेरीवाले पदपथ, रस्ते अडून बसतात.

त्यामुळे इतर वाहनांना या अडथळ्याचा त्रास सहन करावा लागतो. अलीकडे कल्याण पश्चिमेत वाहन कोंडीचे प्रमाण वाढल्याने वाहतूक विभागाने कल्याण पश्चिमेतील अनेक रस्त्यांवर प्रायोगिक तत्वावर वाहने उभी करण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय घेतला आहे. ही वाहने सकाळी सहा ते रात्री ११ वाजेपर्यंत प्रतिबंधित रस्त्यावर उभी करण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

पत्रीपूल ते लालचौकी, जुना आग्रा रस्ता, दुगार्डी ते गोविंदवाडी वळण रस्ता, कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक, नेहरू चौक ते श्री देवी रूग्णालय, सुभाष चौक ते मुरबाड रस्ता शासकीय विश्रामगृह, दीपक हॉटेल ते पुष्पराज हॉटेल, साधना छेद रस्ता ते झुंझारराव बाजार, कराची मेडिकल ते आर्चिस गॅलरी, गुरूदेव हॉटेल ते बस आगार, पाठारे नर्सरी ते आंबेडकर रस्ता, शिवाजी महाराज चौक ते फुले चौक, स्टेट बँक ते मॅक्सी ग्राऊंड, पौर्णिमा चौक ते बिर्ला महाविद्यालय, सहजानंद चौक ते संतोषी माता रस्ता वल्लभ चौक, काझी रुग्णालय ते काळी मस्जिद, दक्षिण मुखी मारूती मंदिर ते मोहिंदरसिंग शाळा, लालचौकी ते पारनाका, खडकपाडा सर्कल ते पोलीस ठाणे, संदीप हॉटेल ते वाणी विद्यालय, प्रेम ऑटे ते शहाड रेल्वे स्थानक, प्रेम ऑटो ते बिर्ला महाविद्यालय, आंबिवली स्थानक ते मोहने बाजार, डी. बी. चौक ते मुख्य चौक.

लॅपटॉपचोरीचे तमिळनाडू कनेक्शन; अख्खा महाराष्ट्र फिरुन त्रिकुटांनी केली चोरी, असा लागला छडा

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

रस्त्यालगत पार्क असलेल्या गाडीच्या काचा फोडून त्यातील लॅपटॉप चोरणाऱ्या त्रिकुटाला वाशी पोलिसांनी अटक केली आहे. सेनिथील दुरायरजन कुमार आर. डी (४८), मूर्ती रामासामी चिन्नाप्पन (३०) व शिवा विश्वनाथन (४७) अशी या त्रिकुटाची नावे आहे. हे चोर लॅपटॉप चोरण्यासाठी तमिळनाडू राज्यातील तिर्ची येथून आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

१० लॅपटॉप जप्त

या चोरांनी नवी मुंबईसह इतर भागांत केलेले सात गुन्हे उघडकीस आले असून वेगवेगळ्या ठिकाणांवरून चोरलेले १० लॅपटॉप जप्त केल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी दिली. या चोरांनी १० जानेवारी रोजी सायंकाळी पावणेसात वाजण्याच्या सुमारास वाशी सेक्टर-१७मधील विज्ञान सोसायटीसमोरील रोडवर पार्क केलेल्या दोन गाड्यांच्या काचा फोडून दोन्ही गाड्यांमधील दोन ऍपल कंपनीचे लॅपटॉप चोरून पलायन केले होते. त्यानंतर वाशी पोलिसांनी अमेय विचारे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोराविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला होता. त्यासाठी पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून आरोपींची ओळख पटवण्यासाठी नवी मुंबई, ठाणे, मुंबई परिसरातील पोलिस ठाण्यातील अभिलेख तपासण्यास सुरुवात केली होती.

संपूर्ण महाराष्ट्रात चोरी

या दरम्यान चोरांनी जे लॅपटॉप चोरले होते, त्यातील अमये विचारे यांचा लॅपटॉप त्यांच्या आय फोनशी कनेक्ट असल्याने विचारे यांना त्यांच्या आयफोनवर वारंवार लॅपटॉपचे लोकेशन मिळत होते. यावरून आरोपींचे लोकेशन सीएसएमटी परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक शशीकांत चांदेकर व पोलिस निरीक्षक संजय नाळे, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक युवराज सालगुडे, पवन नाद्रि, पोलिस उपनिरीक्षक नीलेश बारसे व त्यांच्या पथकाने तत्काळ रेल्वेने सीएसएमटी रेल्वे स्थानक गाठले. यावेळी हे चोर मूळ गावी ट्रेनने पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना, वाशी पोलिसांनी स्थानिक रेल्वे पोलिसांच्या मदतीने लॅपटॉपच्या लोकेशनच्या आधारे तिन्ही चोरांना ताब्यात घेतले. यावेळी त्यांच्याकडे असलेल्या बॅगांची तपासणी केली असता, त्यांच्याकडे वेगवेगळ्या ठिकाणांवरून चोरलेले १० लॅपटॉप सापडले. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडे सापडलेले लॅपटॉप जप्त करून त्यांना अटक केली.

१६० गुंतवणूकदारांचा विकासकाविरुद्ध गुन्हा दाखल

■पनवेल। प्रतिनिधी,

तेरा वर्षानंतरही रोहिंजन गावामध्ये हेक्ससीटी या खासगी महागृह प्रकल्पामधील १६० गुंतवणूकदारांना हक्काचे घर न मिळाल्याने सुप्रिम कन्स्ट्रक्शन डेव्हलपमेंट प्रा. लिमीटेड या विकासक कंपनी आणि त्यांच्या भागीदारांविरोधात तळोजा पोलिसांनी ४४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे. तळोजा पोलिसांनी मुदतीमध्ये सदनिका न दिल्याने गुंतवणूकदारांचे हक्क ध्यानात घेता भारतीय दंडसंहिता १८६० च्या कलम ४०६, ४२० नुसार महाराष्ट्र मालकी हक्क सदनिका बांधण्यास प्रोत्साहन देणे, विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण या नियमांतर्गत ४४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याबद्दल ही कारवाई करण्यात केली आहे.

गणेश बिस्ट व इतर गुंतवणूकदारांनी त्यांची फसवणूक सुप्रीम विकासक कंपनीने केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मागील १३ वर्षात रोहिंजन गावातील नरेंद्रकुमार भल्ला यांच्या १५ एकर जमिनीवर हेक्ससीटी बांधणार असल्याचे सांगून या महागृहनिर्माण प्रकल्पात १८०० सदनिका उभारणार असे गुंतवणूकदारांना सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात अजूनही १६० गुंतवणूकदारांना त्यांचे हक्काचे घर न मिळाल्याने गुंतवणूदकारांनी पोलीस ठाण्यात कायदेशीर कार्यवाही करण्याचा मार्ग निवडला.

२०१० साली ३० ते ४० लाख रुपयांमध्ये सदनिका बांधून देऊ असे गुंतवणूकदारांना सुप्रिम विकासक कंपनीने आश्वासित केले होते. गुंतवणूकदारांनी त्यासाठी बँकेतून कर्ज काढून आणि स्वतःजवळील जमविलेली रक्कम विकासक दिल्यानंतर सुद्धा सदनिका बांधून दिली नाही. मुद्रांक नोंदणी दस्त गुंतवणूकदारांसोबत केल्यानंतर या गृहप्रकल्पाचे नाव क्लॅनसीटी असे बदलण्यात आले. तसेच जमीन मालक भल्ला यांचे सुद्धा पैसे थकविल्याने भल्ला यांनी विकासकाविरोधात न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर न्यायालयाने जमीन मालक भल्ला यांच्यासोबत केलेल्या कराराची पुर्तता विकसक कंपनीने न केल्याने त्यांची बँक खाती गोठविली.

भूमिपुत्रांना रोजगार मिळणे हीच खरी आदरांजली; १९८४ च्या शेतकरी आंदोलनातील हुतात्म्यांना अभिवादन !

■उरण। प्रतिनिधी,

१९८४ साली झालेल्या उरणच्या शौर्यशाली आणि गौरवशाली आंदोलनातील हुतात्म्यांना मंगळवारी जासई हुतात्मा स्मारकात अभिवादन करण्यात आले. स्थानिक भूमिपुत्रांचे योग्य पुनर्वसन आणि रोजगाराचे प्रश्न मार्गी लागणे हीच आंदोलनातील शेतकरी हुतात्मे आणि नेते माजी खासदार दि.बा. पाटील खरी आदरांजली असेल असे मत व्यक्त करण्यात आले. त्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र काम करण्याचेही आवाहन केले. माजी खासदार दिबा पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उरणच्या शेतकरी आंदोलनाने देशातील शेतकऱ्यांना आपल्या जमिनीवरील हक्क आणि त्याचा मोबदला, पुनर्वसन ठरविणारे हक्क मिळवून दिले. त्याचे लोकसभेत कायदेही करण्यात आले. तर प्रकल्पग्रस्तांचे प्रामुख्याने जेएनपीटी आणि सिडको प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित भूखंडांचे वाटपातील अडथळे दूर करून ते शेतकऱ्यांना देण्यात यावेत अशी जोरकस मागणी यावेळी करण्यात आली. तर दास्तान व नवघर येथील गोळीबारातील शेतकरी हुतात्म्यांना मंगळवारी जासई स्मारकात अभिवादन करण्यात आले. १६ व १७ जानेवारी १९८४ या दिवशी उरण मध्ये शासनाच्या नवी मुंबई करीता करण्यात येत असलेल्या भूसंपादनाला शेतकऱ्यांनी दिबांच्या नेतृत्वात केलेल्या शेतकरी लढ्याचा ४० वा हुतात्मा दिन मंगळवारी साजरा करण्यात आला. यावेळी पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयातील एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी मांवनदना दिली.

१९८४ च्या या शेतकरी आंदोलनात १६ जानेवारीला दास्तान व १७ जानेवारी रोजी नवघर फाटा येथे झालेल्या गोळीबारात पाच शेतकऱ्यांनी हौतात्म्य पत्करले, त्यांचे स्मरण केले जाते. या आंदोलनात दास्तान फाटा येथे १६ जानेवारी रोजी सिडको आणि सरकारच्या भूसंपादनाच्या विरोधात एकवटले होते.

'तेव्हा' मी अयोध्येला जाईन, प्रभूरामांचं दर्शन घेईन; पवारांनी पत्र लिहून 'टायमिंग' कळवलं

■मुंबई। प्रतिनिधी,

अयोध्येतील राम मंदिरात २२ जानेवारीला प्रभू रामाची मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येईल. या सोहळ्याची जय्यत तयारी अयोध्या नगरीत सुरू आहे. या सोहळ्याचं आमंत्रण विरोधी पक्षातील नेत्यांनादेखील देण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या सोहळ्याचे प्रमुख अतिथी असतील. प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि माजी अध्यक्षा सोनिय गांधी अनुपस्थित असतील. अखिलेश यादव, ममता बॅनर्जी यांच्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे.

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्राचे महासचिव चंपत राय यांना शरद पवारांनी एक पत्र लिहिलं आहे. २२ जानेवारीला प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाल्यानंतर मी वेळ काढून दर्शनासाठी येईन. तेव्हापर्यंत राम मंदिराचं कामदेखील पूर्ण झालेलं असेल, असं पवारांनी राय यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केलं आहे. राम मंदिराचा वापर भाजप राजकीय हेतूनं करतोय की व्यावसयिक उद्देशानं, हे कळायला मार्ग नाही. पण राम मंदिर होतंय याचा आनंद आहे. त्यासाठी अनेकांनी योगदान दिलं आहे, असं पवार काही दिवसांपूर्वीच म्हणाले होते.

चंपत राय यांना पवारांनी लिहिलेल्या पत्रात काय?

मयार्दा पुरुषोत्तम श्रीराम भारतच नव्हे, जगातील कोट्यवधी भक्तांच्या श्रद्धा आणि आस्थेचं प्रतीक आहेत. अयोध्येतील सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर राम भक्तांमध्ये उत्सुकता आणि आतुरता आहे. ते मोठ्या संख्येनं अयोध्येत पोहोचत आहेत. त्यांच्या माध्यमातून या ऐतिहासिक सोहळ्याचा आनंद माज्यापर्यंत पोहोचेल. २२ जानेवारीला होणाऱ्या प्राणप्रतिष्ठेनंतर रामललाचं दर्शन सहज आणि निवांतपणे घेता येईल. माझा अयोध्येला येण्याचा विचार आहे. तेव्हा रामललाजींचं दर्शन करेन. तोपर्यंत राम मंदिराचं बांधकाम पूर्ण झालेलं असेल, असं पवारांनी पत्रात नमूद केलं आहे.

घणसोली-ऐरोली प्रकल्प दृष्टिपथात; पामबीच मार्ग विस्तारीकरण प्रकल्पाची निविदा जाहीर

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

बऱ्याच वर्षांच्या विलंबानंतर पामबीच मार्गाच्या विस्तारीकरणाचा महत्त्वपूर्ण प्रकल्प असलेल्या घणसोली ते ऐरोली प्रकल्प आता दृष्टीक्षेपात आला असून या प्रकल्पाची निविदा प्रसिध्द झाली असून सोमवारी या प्रकल्पाच्या तांत्रिक निविदा उघडण्यात आली आहे. जवळजवळ ५४० कोटींचा खर्च या प्रकल्पासाठी येणार असून त्यासाठी सिडको २७० कोटी देणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने संबंधित प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या प्राप्त केल्या आहेत आणि ऐरोली-मुलुंड खाडी पुलापर्यंत रस्ता वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सुधारित आराखड्यामुळे रस्त्याची लांबी ३.४७ किमीने वाढणार आहे. तसेच याच मार्गावर १.९५ किमीचा उड्डाणपूलही होणार आहे.

सिडकोने बेलापूर ते ऐरोली सेक्टर १० ए पर्यंत २१.१२ कि.मी. लांबीचा पामबीच रोड प्रकल्प प्रस्तावित केला होता. बेलापूर ते घणसोली हा १९.२० कि.मी.चा रस्ता सिडकोने बांधला होता, परंतु उर्वरित दोन किलोमीटरचे काम खारफुटीच्या क्षेत्राचा समावेश असल्याने रखडले होते. २००९ मध्ये सिडकोने अपूर्ण पामबीच रोड प्रकल्पासह घणसोली नोड महापालिकेकडे हस्तांतरित केला होता. नवी मुंबई महापालिकेने या प्रकल्पासाठी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटी, वन विभाग, खारफुटी संवर्धन समिती, पर्यावरण संबंधित प्राधिकरणांकडून परवानग्या मिळवल्या आहेत.

केवळ मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी प्रलंबित असून पालिकेने यापूर्वीच कार्यवाही केली आहे. उर्वरित पामबीच विस्तारीकरणात रस्त्याचे बांधकाम ३.४७ कि.मी.चे असून उड्डाणपूल हा १.९७ कि.मी.चा असल्याची माहिती या प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता मनोहर सोनावणे यांनी दिली.

वेगवान दळणवळण

घणसोली-ऐरोली पामबीच रोड प्रकल्पामुळे वाहतुकीची चांगली सुविधा होणार असून ऐरोली-मुलुंड पूल आणि ऐरोली-काटई मार्गाला जोडला जाईल. त्यामुळे कल्याण, बदलापूर, अंबरनाथ, मुरबाड भागांत वेगाने प्रवास करता येईल.

खाद्यपदार्थांच्या गाड्यांचे धोरण नसताना उच्चभ्रूवस्तीत पंचतारांकित उपाहारगृहाचा ट्रक

■मुंबई। प्रतिनिधी,

खाद्यपदार्थांच्या बंदिस्त गाड्या म्हणजेच फूड ट्रकबाबतचे धोरण गेल्या किमान दोन झ तीन वर्षांपासून रखडलेले असताना वांद्रे येथील उच्चभ्रू वस्तीत दोन ठिकाणी एका पंचतारांकित हॉटेलच्या खाद्यपदार्थांच्या गाड्या उभ्या करण्यासाठी पालिका प्रशासनाने विशेष परवानगी दिली आहे. कार्टर रोड आणि बॅण्ड स्टॅण्ड येथे या गाड्या गेल्या आठवड्यापासून उभ्या आहेत. या परिसरातील रहिवाशांनी या गाड्यांना आक्षेप घेतला आहे.

पालिकेने २०२० मध्ये नाईट लाईफ अर्थात रात्रीची मुंबई ही संकल्पना राबवण्याचे ठरवले. तेव्हा पर्यटनस्थळी फूड ट्रक म्हणजेच खाद्यपदार्थांच्या बंदिस्त गाड्या उभ्या करण्यास परवानगी देण्याचाही निर्णय घेण्यात आला होता. त्याकरीता धोरणही ठरवण्यात आले होते. मात्र हॉटेल चालकांच्या संघटनेने या धोरणाला विरोध केला होता. अनेक त्रुटी असल्यामुळे अखेर हे धोरण रद्द करण्यात आले होते. तसेच नवीन धोरण ठरवण्याचे आदेश पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी दिले होते.

हे धोरण गेल्यावर्षी पालिकेने तयार केले. या धोरणाअंतर्गत समाजातील गरीब घटकांतील नागरिकांना रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच मुंबईकरांना स्वस्तात चांगले खाद्यपदार्थ उपलब्ध व्हावेत अशी या मागची कल्पना होती. मात्र वांद्रे परिसरात एका पंचतारांकित हॉटेलच्या दोन गाड्या दिसू लागल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

वैमानिकाचे प्रशिक्षण देण्याचे आमिष दाखवून २६ लाखांची फसवणूक

■मुंबई। प्रतिनिधी,

तरुण मुलाला वैमानिकाचे प्रशिक्षण देण्याचे आमिष दाखवून वडिलांची २६ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना चेंबूर येथे घडली. याप्रकरणी आरसीएफ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

चेंबूर मधील आरसीएफ परिसरात तक्रारदार वास्तव्यास असून त्यांच्या मुलाला वैमानिकाचे प्रशिक्षण घ्यायचे होते. त्यामुळे त्यांनी याबाबत माहिती मिळविण्यासाठी अनेकांशी संपर्क साधला होता. त्यांच्या मित्राची मुलगी वैमानिक असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी तिला घरी बोलावून याबाबत माहिती विचारली असता ओळखीच्या प्रशिक्षण केंद्रात प्रवेश देण्याचे आश्वासन तिने तक्रारदारांना दिले.

मित्राची मुलगी असल्याने तिने सांगितल्याप्रमाणे तक्रारदारांनी टप्पाटप्याने तिला २६ लाख रुपये दिले. अनेक महिने उलटल्यानंतरही मुलाला प्रशिक्षण केंद्रात प्रवेश न मिळाल्याने त्यांनी मित्राची मुलगी शरदी पै हिच्याकडे विचारपूस केली.

'अटल सेतू'साठी वाढीव भरपाई; संपादित जमिनींच्या मालकांना मिळणार कोट्यवधी रुपये

■मुंबई। प्रतिनिधी,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच उद्घाटन झालेल्या ह्यअटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतूह्ण (अटल सेतू) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी संपादित केलेल्या ७ हेक्टर ५१ गुंठे जमिनीबाबत राज्य सरकारला मंगळवारी झटका दिला असून, यामुळे जमीन मालकांना भरपाईपोटी कोट्यवधी रुपये मोजावे लागणार आहेत.

रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील जासई गावातील या जमिनीबाबतच्या भूसंपादन भरपाईचा निवाडा मुदतीत जारी केला नसल्याने ती प्रक्रिया व्यपगत झाल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच जमीन मालकांना ह्यभूसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना प्रक्रियेतील पारदर्शकता व वाजवी भरपाईचा हक्क, २०१३ह्ण या कायद्यांतर्गत लवकरात लवकर आर्थिक भरपाई देण्याचा आदेश दिला आहे. परिणामी जमीन मालकांना भरपाईपोटी देण्यासाठी सरकारला कोट्यवधी रुपये मोजावे लागणार आहेत.

सिडकोने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रस्तावित केल्यानंतर तो राबवण्याची जबाबदारी एमएमआरडीएवर सोपवण्यात आली होती. सिडकोने जासई गावातील १५ हेक्टरहून अधिक जमीन संपादित करण्याचे ठरवल्यानंतर त्यापैकी सुमारे ८.६६ हेक्टर जमीन करारांद्वारे घेतली. तर उर्वरीत ७ हेक्टर ५१ गुंठे जमिनीबाबत उपजिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादन कायदा, १८९४ या जुन्या कायद्याद्वारे भूसंपादन प्रक्रिया सुरू केली. त्याबाबतची अधिसूचना २ जुलै, २००९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार विविध जमीन मालकांना नोटीस देण्यात आली.

मुंबई हायकोर्टाने कोल्हापूर न्यायालयाला फटकारले; गोविंद पानसरे हत्या प्रकरणात कानउघडणी



■मुंबई। प्रतिनिधी,

'कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी समीर गायकवाड याचा जामीनअर्ज गुन्ह्यासंदभार्तील पुरावे लक्षात घेऊन पूर्वी उच्च न्यायालयाने फेटाळलेला असताना कोल्हापूर सत्र न्यायालयाने पुन्हा त्यावर सुनावणी घेणे चुकीचे होते. ते न्यायिक शिस्त व न्यायिक औचित्याला धरून नव्हते', अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, त्याचवेळी गायकवाडला जामीन मंजूर करण्याच्या सत्र न्यायालयाच्या आदेशाविरोधातील राज्य सरकारचा अर्जही फेटाळून लावला आहे. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कॉ. पानसरे हे त्यांच्या पत्नी उमा देवी यांच्यासोबत मॉर्निंग वॉकवरून परतत असताना दुचाकीवर आलेल्या दोघांनी पानसरे यांच्यावर गोळ्या झाडल्या होत्या. त्यात गंभीर जखमी झालेले पानसरे यांचा २० फेब्रुवारी २०१५ रोजी मृत्यू झाला. या प्रकरणात गायकवाडला १६ सप्टेंबर २०१५ रोजी अटक झाली होती. त्याचा जामीनअर्ज कोल्हापूर न्यायालयाने २८ जानेवारी २०१६ रोजी फेटाळल्यानंतर त्याने उच्च न्यायालयात अर्ज केला होता.

मात्र, अथर्व शिवे नावाच्या प्रत्यक्षदर्शी लहान मुलाने हल्लेखोर म्हणून गायकवाडला ओळख परेडमध्ये ओळखले होते, हा गंभीर मुद्दा लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने ११ जुलै २०१६ रोजी अर्ज फेटाळला होता. त्यानंतर गायकवाडने पुन्हा कोल्हापूर न्यायालयात अर्ज केला होता. त्यावर त्या न्यायालयाने १७ जून २०१७ रोजी गायकवाडला सशर्त जामीन मंजूर केला.

कल्याणमधील मेट्रो मार्गातील बांधकामे रोखली

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण-तळोजा या १२ क्रमांकाच्या मेट्रो मार्गाच्या उभारणीसाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाच्या मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी विभागाने हालचाली सुरू केल्या आहेत. या प्रस्तावित मेट्रो १२ रस्ते प्रकल्पाची पाहणी करत असताना 'एमएमआरडीए'च्या अधिकाऱ्यांना कल्याण डोंबिवली पालिकेने आपली 'ना हरकत विकासकांकडून न घेता परस्पर इमारत बांधकाम परवानग्या दिल्या आहेत. ही सर्व चारही गृहप्रकल्पांची बांधकामे तातडीने थांबविण्याच्या सूचना 'एमएमआरडीए'च्या मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विकासकांना दिल्या आहेत. 'एमएमआरडीए'ने थेट हस्तक्षेप करून ही बांधकामे थांबविल्यामुळे कल्याण डोंबिवली पालिका अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. मेट्रो मागार्चे कल्याण शहर परिसरातील नियोजन ठरले असताना आणि तो आराखडा पालिकेच्या नगररचना विभागाकडे असताना नगररचना विभागातील ज्या अधिकाऱ्यांनी 'एमएमआरडीए'चा विकासकांकडील ना हरकत दाखला न बघता, या कागदपत्रांची छाननी न करता परस्पर बांधकाम परवानग्या दिल्या आहेत. त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी तक्रारदार मनोज कुलकर्णी यांनी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्याकडे केली आहे. कल्याण मधील मेट्रो मार्ग दुगार्डी किल्ला, सहजानंद चौक, शिवाजी चौक, कल्याण रेल्वे स्थानक, वलीपीर रस्ता ते कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, पत्रीपूल पर्यंत प्रस्तावित आहे.

आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तकांची पंचायत समिती, महापालिकेवर धडक

■नाशिक। प्रतिनिधी,

आशा स्वयंसेविका आणि गट प्रवर्तकांच्या संपादरम्यान मान्य केलेल्या मागण्यांचा शासन निर्णय जाहीर न झाल्याने तसेच अन्य प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आयटक आशा व गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने बुधवारी येथे पंचायत समिती कार्यालय आणि महानगरपालिकेसमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी पालकमंत्री दादा भुसे यांची भेट घेतली. आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात भूमिका मांडली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानात राज्यातील सुमारे ७० हजार आशा स्वयंसेविका व साडेतीन हजारापेक्षा अधिक गटप्रवर्तक कार्यरत आहेत. संबंधितांनी प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी १८ ऑक्टोबर ते एक नोव्हेंबर या कालावधीत संप केला. त्यावेळी आरोग्य मंत्र्याबरोबर कृती समितीची बैठक झाली. बैठकीत आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना दिवाळी भेट दोन हजार रुपये दिवाळीपूर्वी देण्यासह अन्य मागण्यांबाबत आरोग्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. परंतु, त्यानंतरही गटप्रवर्तक व आशा यांच्या मोबदल्यात समाधानकारक वाढ झालेली नाही. उलट वेगवेगळ्या योजनासंदर्भात ऑनलाईन कामे करण्याच्या सूचना येत आहेत.

रिक्षाच्या चावीने हत्येचे गूढ उकलले

■मुंबई। प्रतिनिधी,

कुल्यार्तील मिठी नदीत एका तरुणाचा मृतदेह सापडला. सुरुवातीला या मृतदेहाची ओळख पटत नव्हती. पण केवळ रिक्षाच्या चावीमुळे या संपूर्ण प्रकरणाचा छडा लावण्यात गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले. मृत व्यक्ती अमान अब्दुल शेख रिक्षाचालक होता. या हत्येचा मुख्य सूत्रधार नफीस खानकडून अमान ३०० रुपये प्रतिदिन रिक्षा भाड्याने घ्यायचा. पण संशयाचे भूत नफीसच्या डोक्यात शिरले आणि त्याने मोहम्मद साकीर सेद व मुकेश पाल यांच्या मदतीने अमानचा काटा काढला. नफीसकडे सहा रिक्षा होत्या. त्या सर्व तो भाड्याने द्यायचा. अमानही त्याच्याकडून रिक्षा भाड्याने घेत होता. त्यामुळे त्याचे नफीसच्या घरी येणे व्हायचे. त्या वेळी नफीसला अमानचे आपल्या पत्नीसोबत प्रेमसंबंध असल्याचा संशय होता. त्यातून पती-पत्नीमध्ये अनेक वेळा भांडणेही झाली होती. नेहमीच्या या भांडणांना कंटाळून नफीसची पत्नी घर सोडून माहेरी निघून गेली होती. त्यामुळे नफीसला अमानबद्दल प्रचंड द्वेष निर्माण झाला होता. अमानप्रमाणे साकीर व मुकेशही नफीसकडून रिक्षा भाड्याने घ्यायचे. या दोघांच्या मदतीने अमानचा काटा काढण्याचा कट नफीसने रचला. नेहमीप्रमाणे ५ जानेवारीला अमान रिक्षाचे प्रतिदिन भाडे घेऊन नफीसच्या गोवंडी येथील घरी आला. त्या वेळी बोलण्यात गुंतवून नफीसने दोन्ही साथीदारांच्या मदतीने अमानचा गळा दाबून त्याची हत्या केली. त्यानंतर अमानचा मृतदेह रिक्षामधून मिठी नदीच्या जवळ नेला व मृतदेह फेकून त्यांनी रिक्षा जवळच उभी केली. नफीसने त्या रिक्षाच्या चाव्या स्वतःकडे ठेवल्या. दुसऱ्या दिवशी मिठी नदीत बेवारस मृतदेह सापडला.

रुग्णवाहिकेतून गांजा विक्री करणाऱ्या टोळीचा पदार्फाश; अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

■पिंपरी- चिंचवड। प्रतिनिधी,

पिंपरी- चिंचवडच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गांजाची तस्करी करणाऱ्या टोळीचा पदार्फाश केला आहे. वेगवेगळ्या केलेल्या कारवाईत एकूण एक कोटी ३१ लाखांचा ९६ किलो गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. गंभीर बाब म्हणजे आरोपी हे रुग्णवाहिकेतून गांजा विक्री करत असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. कृष्णा मारुती शिंदे, अक्षय बारकू मोरे, हनुमंत भाऊसाहेब कदम, देवी प्रसाद उर्फ देवा सीताराम डुकळे, सन्नीदेवल सिध्दार्थ शर्मा, सन्नीदेवल भगवानदास भारती आणि सौरभ निर्मल यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी रावेत पोलीस ठाण्याच्या हद्दीतून कृष्णा मारुती शिंदे, अक्षय बारकू मोरे आणि हनुमंत भाऊसाहेब कदम यांना ताब्यात घेतलं. त्यांच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर ३० लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यात २५ लाख ३९ हजार किमतीचा २५ किलो गांजा, चारचाकी आणि चार मोबाईलचा समावेश आहे. आरोपींनी गांजा देवी प्रसाद उर्फ देवा सीताराम डुकळे यांच्याकडून आणला होता. तो सौरभ निर्मल यास विकणार असल्याचं तपासात समोर आलं आहे. त्यांच्या विरोधात रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, आरोपी देवी प्रसादलाही अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून ५० लाख २० हजारांचा ५० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. आरोपी हे रुग्णवाहिकेतून गांजाची विक्री आणि डिलिव्हरी करत असल्याच तपासात समोर आले आहे. तसेच सन्नीदेवल सिध्दार्थ शर्मा आणि सन्नीदेवल भगवानदास भारती यांच्याकडून २० लाख ७९ हजारांचा २० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. असा एकूण १ कोटी ३१ लाखांचा ९६ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. हा गांजा रूपीनगर चिखलीत विकणार असल्याचं समोर आलं आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक वैभव शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

विजेच्या धक्क्याने जिल्ह्यात दोन जणांचा मृत्यू

■नाशिक। प्रतिनिधी,

नेहमीची कामे करत असताना विजेचा धक्का लागल्याने जिल्ह्यात दोन ठिकाणी दोन जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणी वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. नांदगाव तालुक्यातील लक्ष्मीनगर परिसरात राहणारी १६ वर्षाची शितल गरुड ही घरातील टाकी पिण्याच्या पाण्याने भरण्यासाठी मोटार सुरु करण्यास विहिरीवर गेली असता तिला विजेचा धक्का लागल्याने ती विहिरीत फेकली गेली. नातेवाईकांनी तिला तातडीने नांदगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. नांदगाव पोलीस ठाण्यात यासंदर्भात नोंद करण्यात आली आहे.

दुसरी घटना वडनेर भैरव परिसरातील म्हसोबा नगरात घडली. दिवल्या वळवी (४५) हे वडनेर भैरव परिसरातील ३३ केव्ही महावितरण उपकेंद्राच्या खांबावर चढून काम करत असतांना त्यांना विजेचा धक्का लागला. त्यांना तातडीने येवला उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी वडनेर भैरव पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

देशाला कृषिमंत्री द्या! यवतमाळच्या शेतकऱ्याचे पंतप्रधानांना साकडे

■यवतमाळ । प्रतिनिधी,

कृषीप्रधान देश म्हणून भारताचा नावलौकीक जगात आहे. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारमध्ये या कृषीप्रधान देशाला कृषिमंत्री नाही. त्यामुळे कृषीहिताच्या निर्णयांकडे केंद्र सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, अशी टीका करत यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्याने थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रशासनामार्फत निवेदन पाठवून देशाला कृषिमंत्री देण्याची मागणी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील शेतकरी मनीष जाधव यांनी हे पत्र जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठवले आहे. या पत्रात मनीष जाधव यांनी आपला कृषीप्रधान या शब्दावरच आक्षेप असल्याचे नमूद केले आहे. केंद्र सरकारची शेतकऱ्यांप्रती असलेली अक्षम्य दिरंगाई व दुर्लक्षामुळे देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये मोठी वाढ झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणतेच निर्णय घेतले जात नाही, तसेच ठोस कृषी धोरणही नसल्याचे टीकाही या शेतकऱ्याने केली आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून पूर्णवेळ कृषिमंत्री नियुक्त करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

यासोबतच शेतमालावरची निर्यातबंदी उठवून आयातशुल्क कमी करावे, शेती बंधनमुक्त करावी, केंद्र सरकारचा हस्तक्षेप कमी करावा, साठवणुकीवरील बंदी उठवावी, वायदे बाजावरील बंदी उठवावी, अशा विविध मागण्या शेतकऱ्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदनातून केल्या आहेत. राज्यातील शेतकरी विविध अडचणींना तोंड देत असल्याचे पत्रात म्हटले आहे.

नापिकी, नैसर्गिक आपत्ती, कर्जबाजारीपणा, उत्पादनातील घट आदी कारणांनी आर्थिक विवंचना वाढल्याने शेतकरी मानसिक तणावाखाली असून नैराश्यात आहे. यावरही तोडगा काढून हमीभाव देण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यत कार्यक्रमांद्वारे रामाचा जप; शिवसेना, भाजप आणि संस्थांकडून कार्यक्रमांचे आयोजन

■ठाणे। प्रतिनिधी,

आयोध्येत २२ जानेवारीली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिराचे उद्घाटन आणि मुतीर्ची प्रतिष्ठापना होणार आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यात शिवसेना, भाजप आणि संस्थांकडून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून त्यात राम कथा,पालखी मिरवणुका, रामायण महोत्सव, तलाव परिसरात महाआरती, व्याख्यान, रामाच्या जीवन प्रवासावर आधारित लेझर शो, अशा कार्यक्रमांचा समावेश आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून जिल्ह्यात आठवडाभर रामाचा जप होणार आहे. तसेच विविध संस्थांकडून दिपोत्सव साजरा करण्याची तयारी सुरू आहे.

आयोध्येत २२ जानेवारीली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिराचे उद्घाटन आणि मुतीर्ची प्रतिष्ठापना होणार आहे. त्यानिमित्ताने देशभरात रामाचा जागर सुरू झाला असून ठाणे जिल्ह्यातही असेच काहीसे चित्र दिसून येत आहे. ठाणे शहरातील राम मंदीराची प्रतिकृती असलेला रथ गृहसंकुले तसेच परिसरात नेऊन नागरिकांना अक्षतांचे वाटप करण्यात येत आहे. या रथाद्वारे घोडबंदर भागातील १८० गृहसंकुलांमधील नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांना अक्षता वाटप करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर ठाणे, घोडबंदर तसेच विविध भागात राम कथेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना मोठी गर्दी होत आहे. त्याचबरोबर अनेक संस्थांकडून दिपोत्सव साजरा करण्याची तयारी सुरू आहे. ठाण्यात २० ते २२ जानेवारी या काळावधीत रामायण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सृजन संपदाच्या माध्यमातून माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे आणि प्रदेश भाजप प्रवक्ते सुजय पतकी यांनी या महोत्सवाचे आयोजन केले आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेचा (एआय) वापर करून रामाच्या जीवनप्रवासावर आधारीत रांगोळ्या या महोत्सवाचे विशेष आकर्षण असणार आहे. या महोत्सवात ५०० वर्षांचा मंदिराचा प्रवास चित्र प्रदर्शनीच्या माध्यमातून दाखविण्यात येणार आहे. तसेच कारसेवक हुतात्मा स्तंभ उभारला जाणार आहे. शालेय विद्यार्थ्यांची श्रीराम जीवनातील विविध प्रसगांवर चित्र कला स्पर्धा होणार आहे. २२ जानेवारीला भाजपा ठाणे शहरतर्फे मासुंदा तलावाच्या काठावर भव्य दीपोत्सव साजरा केला जाणार आहे. त्याचबरोबर १०० ढोल व ३० ताशांसह होणाऱ्या महावादनाच्या कार्यक्रमातून श्री रामाला वंदन केले जाणार आहे. ठाणे शहरातील नागरिकांना श्री राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेचा सोहळा पाहता यावा, यासाठी शहरातील १२ ठिकाणच्या मंदिराबाहेर भव्य एलईडी स्क्रीन लावून सोहळ्याचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे.